Library

किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक


३ ● जोष

*विश्व युवकांचे*

५ ■ युवक, समाज आणि माध्यमे
१३ ■ युवा सहभागाच्या दिशेने....
२१ ■ आव्हान गरिबी व बेरोजगारीचे

२७ ● जिकडेतिकडे
(नॅनोटेक्नॉलॉजी : निव्वळ धोकेच की संधीही?)

३३ ● अर्थबोधपत्रिका पुरवणी
('भारतातील गरिबी सरकारच्या अकार्यक्षमतेपायीच!')


खंड ६ : अंक १०		जानेवारी २००८

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**

**वर्गणीसाठी पत्ता :**

**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com

---

**अर्थबोधपत्रिका**

**खंड ६ (अंक १०) जानेवारी २००८**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

### *'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

### *'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

### *'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# जोष

'अर्थबोधपत्रिके'च्या परिवारातील सर्वच लहानथोरांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! सगळेच दिवस म्हटले तर सारखेच असतात. मात्र त्याच दिवसांना तारीखवारांचे लेणे लेवविले की उगविणाऱ्या प्रत्येक दिवसावर नाविन्याची नव्हाळी चढते. प्रत्येक दिवस आणि प्रत्येक क्षण नित्यनूतन भासू लागतो. ताजेतवाने होऊन एका नवीनच जोषाने आपण सारे कामाला लागतो. जोष हे तारुण्याचे गमक. त्यातच, 'तरुणांचे प्रजासत्ताक' अशी भारताची ओळख आताशा रूढ होऊ लागली आहे. भारताच्या लोकसंख्येची विद्यमान जडणघडणच त्या ओळखीस पूरक ठरते. चालू असणारे २१ वे शतक हे निर्विवादपणे आशिया खंडाचे असेल, या प्रतिपादनास केवळ राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरूनही पुष्टी मिळत आहे. चीन आणि भारत हे आशिया खंडातील दोन बलाढ्य शेजारी. भारतीय अर्थव्यवस्थेपेक्षा चिनी अर्थव्यवस्था आज अनेकांगांनी सरस दिसत असली तरी, सर्वसाधारण सरासरी चिनी लोकसंख्या तारुण्याच्या माध्यान्हातून ढळून प्रौढत्वाच्या उतरणीला लागत आहे. भारताची परिस्थिती त्याच्या उलट आहे. परिणामी, तरुणाईचे संख्यात्मक प्राबल्य असलेली भारतीय अर्थव्यवस्था ही दीर्घकालिक दमदार वाटचालीसाठी उभ्या जगातच तुलनेने अधिक सक्षम ठरेल, असे चित्र सामोरे येते आहे. 'तरुणच देशाचे खरे भाग्यविधाते' यांसारखी हमखास टाळ्या घेणारी वाक्ये आपण आजवर व्यासपीठांवरून एकतर बोलत तरी होतो किंवा राजकीय समारंभांमधून ऐकत तरी होतो. आता त्या वाक्याला वास्तवात अर्थ प्राप्त होण्याची वेळ आली आहे. तरुणाईची संख्यात्मक बहुलता हे भारताच्या अफाट 'मनुष्यसंख्ये'स 'मनुष्यबळा'चे परिमाण प्राप्त करून देणारे आद्य माध्यम वा साधन आहे. 'बळ' या संकल्पनेमध्ये 'संख्या' आणि 'गुणवत्ता' या उभय बाबींचा अंतर्भाव आहे. भारताकडे असलेल्या विपुल तरुणाईची गुणवत्ता आज नेमक्या कोणत्या दर्जाची आहे, तिच्या ठायीच्या उत्पादक आणि सर्जक क्षमतांचे भरणपोषण आणि उपयोजन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पूरक व्यवस्था व यंत्रणा, पायाभूत सुविधा आजमितीस या तरुणाईस उपलब्ध होतात का

यांसारखे विविध प्रश्न या ठिकाणी मग उपस्थित होतात. कारण देशातील या तरुणाईचा कारक जोष नेमका याच बाबींवर अवलंबून राहणार आहे. या संदर्भातील अभ्यास, संशोधन अहवाल, सर्वेक्षणे आपल्याकडे त्या मानाने क्वचितच आढळतात. तरुणाईच्या आशा-अपेक्षा-आकांक्षा, त्यांच्या ठायीच्या 'केपेबिलिटिज्', तरुणांना जाणवणाऱ्या अडचणी, त्यांना गरजेच्या वाटणाऱ्या 'सपोर्ट सिस्टिम्स्', समाजव्यवस्थेतील तरुणांचे स्थान व सामाजिक घडामोडींमधील त्यांचा सहभाग, तरूणांच्या सामाजिक-आर्थिक-राजकीय जाणिवा, तरुणाईचे आर्थिक व भौतिक जीवन व त्यातील आव्हाने, समाजाचा एक जबाबदार सर्जक घटक म्हणून जडणघडण होण्यात येणाऱ्या अडचणी... अशा नानाविध पैलूंसंदर्भात पुरेशा, विश्वसनीय, शास्त्रीय आणि विश्लेषक अशा संख्यात्मक तसेच गुणात्मक माहितीचा अभाव असल्याचे पदोपदी अनुभवास येते. पुन्हा, भारतीय तरुणाईचा अलगपणे वा स्वायत्तपणे विचार करणेही चुकीचेच ठरेल. कारण, भारतीय तरूण हा वैश्विक तरुणाईचा एक अविभाज्य हिस्सा आहे. मग ही वैश्विक तरुणाई तरी आहे कशी, असा पुढचा प्रश्न उद्‌भवतो. 'अर्थबोधपत्रिके'चा नवीन कॅलेंडर वर्षातील हा पहिलाच अंक याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी खर्ची घातलेला आहे. वैश्विक पातळीवरील तरुणाईचा तपशीलवार अभ्यास करण्यासाठी फार मोठे आणि समृद्ध असे संदर्भसाहित्य लगोलग उपलब्ध होईल, असा दावा करण्यासारखी परिस्थिती नाही. 'पत्रिके'च्या ठायी असणाऱ्या अंगभूत मर्यादा, हा भाग तर आहेच. *(कृपया पृष्ठ ३१ पहावे)*

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# युवक, समाज आणि माध्यमे

प्रचंड ऊर्जा, दुर्दम्य इच्छाशक्ती, अडचणींशी दोन हात करण्याची कायमच मानसिक तयारी आणि आव्हाने पेलण्याची क्षमता हे सळसळत्या तारुण्याचे वैशिष्ट्य. या वैशिष्ट्याला जोड मिळाली आहे ती संख्येची. म्हणजे, चालू शतकात २०१५पर्यंत, २५ वर्षांखाली असणाऱ्या तरुणांची संख्या ही संपूर्ण जगाच्या लोकसंख्येच्या निम्मी असणार आहे. दुसऱ्या शब्दांत, चालू शतक हे युवकांचे असणार आहे. ही बाब लक्षात घेऊनच राष्ट्रसंघाच्या सहस्रक विकास उद्दिष्टांत (मिलेनियम डेव्हलपमेन्ट गोल्स) युवकांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. म्हणून राष्ट्राराष्ट्रांचा आधारस्तंभ असणाऱ्या या युवकांच्या जीवनांत डोकावण्याचा प्रयत्न राष्ट्रसंघाने केला आहे. युवकांचे समाजजीवन कसे आहे, सामाजिकतेचा संदर्भ लक्षात घेता ते कोणकोणत्या कामांत सहभागी झालेले आढळतात वा अलीकडे होत आहेत, जागतिकीकरणाचा, माहिती-तंत्रज्ञानाचा परिणाम त्यांच्यावर कशाप्रकारे होतो आहे, त्यांच्या समोरचे प्रश्न कोणते, वेगाने विस्तारणाऱ्या प्रसारमाध्यमांचा परिणाम त्यांच्यावर कसा होतो, या माध्यमांचा उपयोग ते कशाप्रकारे करून घेत आहेत, त्यांचा सामाजिक-राजकीय सहभाग वाढतो आहे किंवा कसे, सशस्त्र संघर्षाचे कोणते परिणाम त्यांच्यावर होतात, इत्यादी अनेक प्रश्नांचा तसेच या संदर्भात युवकांच्या बाबतीतील राष्ट्रसंघाचे कार्य कसकसे पुढे गेले, याबाबतचा अभ्यासपूर्ण ऊहापोह संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध देशांमधील अभ्यासकांनी युवकांच्या सहकार्याने तयार केलेल्या अहवालांद्वारे केला आहे. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे येथे मांडले आहेत.

कालौघात होणारे नवनवे व समाजधारणेस उपयुक्त असे बदल स्वीकारणे हे देशादेशांप्रमाणे, समाजगटांप्रमाणे बदलणाऱ्या संस्कृतींचे वैशिष्ट्य. अशा बदलांना सामावून घेताना जुने व काळाच्या कसोटीवर उतरलेले आचार-विचार आणि परंपरा टिकविणे संस्कृती-संवर्धनासाठी आवश्यक बनते. अशा प्रक्रियेतून संस्कृतींची व समाजांची वाटचाल प्रगतीच्या दिशेने होत जाते. अशा बदलांमध्ये विविध समाजगटांमधील तरुणपिढीची ज्याप्रमाणे आपली अशी एक संस्कृती आकाराला येत असते त्याप्रमाणेच

त्या 'तरुण संस्कृती'ची एक खास भाषाही. जागतिकीकरणाच्या या काळात, तंत्रज्ञानाचा वरचष्मा असताना एक वेगळेच 'यूथ कल्चर' आकारला येते आहे की काय, अशी चर्चा अलीकडे होताना दिसते. तसे पाहता 'ग्लोबल यूथ कल्चर'ची व्याख्या नेमकेपणाने करणे अवघडच आहे. कारण अशी सरसकट एक व्याख्या करणे म्हणजे जगातील सर्वच्या सर्व युवकांचे ते एक 'कॉमन कल्चर' आहे, असे त्यातून ध्वनित होईल, आणि वेगवेगळ्या समाजगटांत, भिन्नभिन्न संस्कृतींमध्ये, निरनिराळ्या परंपरांमध्ये विभागल्या गेलेल्या सर्वच युवकांची एकच अशी संस्कृती असेल तरी कशी ? त्यामुळे 'यूथ कल्चर' म्हणजे युवकांचे 'स्वतःचे असा खाजगी अवकाश' (वा त्यांची 'फ्री स्पेस') असा त्याचा एक साधा अर्थ मानला गेला आहे. दुसऱ्या शब्दात, 'प्रौढांच्या जगापेक्षा वेगळे व प्रौढांचा संबंध वा हस्तक्षेप नसणारे असे हे युवा वर्गाचे स्वतंत्र विश्व' असते. या विश्वाच्या माध्यमातून समाजात स्वतःची अशी जागा निर्माण करण्याचा प्रयत्न ते या वेळी करीत असतात, असेही आढळते.

युवकांच्या संदर्भात काही अभ्यासकांनी १९७०च्या दशकाच्या अखेरीस कामगार व मध्यमवर्गीय अशा दोन गटांतील युवकांचा अभ्यास केला. हे दोन्ही गट cultures of consumption या गटात मोडणारे होते. शिवाय, नागरी संस्था वा स्वयंसेवी संस्था यांच्याशी संबंधित अशी काही गटांची स्वतःची अस्मिता होती. उपभोगवादाच्या विरोधात झालेल्या चळवळीच्या वेळी युवा गटांकडून काही सामायिक मूल्ये पुढे आली (ही मूल्ये नेमकी कोणती हे अभ्यासकांनी स्पष्ट केले नसले तरी साधारणतः ती लोकशाही तत्त्वांच्या जवळ जाणारी, पर्यावरणाला प्राधान्य देणारी असावीत, असा अंदाज मांडण्यास जागा आहे). जागतिक पातळीवर लोकशाहीच्या तत्त्वांना प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी काही विशिष्ट उत्पादनांचा उपभोग घेण्यापासून दूर राहणे असे मुद्दे पुढे आले नाहीत. १९९०च्या दशकाच्या अखेरीस सामायिक मूल्यांना मानणाऱ्या संस्कृतींनी देशांच्या सीमारेषा ओलांडणे ही एक सहज बाब बनली.

अलीकडच्या काळात 'यूथ कल्चर' हे व्यापारीकरणाशी जोडले गेले आहे. एक वेगळा ग्राहकवर्ग अशी त्याची ओळख बनली असून अनेक कंपन्या त्यांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्नही करीत आहेत. आपल्या या तरुण ग्राहकवर्गापर्यंत पोचण्यासाठी या कंपन्या विविध माध्यमांचा उपयोग करीत आहेत. स्वाभाविकच 'यूथ कल्चर'चा विचार करताना माध्यमांचा विचार करणे क्रमप्राप्तच ठरते. युवकांमध्ये इंटरनेट, ई-मेल,. ब्लॉग्ज, यू ट्यूब, व्हीसीडी, डीव्हीडी, एसएमएस, स्थानिक व इतर

दूरचित्रवाहिन्या आणि रेडिओ ही माध्यमे अधिक लोकप्रिय आहेत. या नवमाध्यमांचा विचार केला तर आजचे हे 'यूथ कल्चर' आंतरराष्ट्रीय आहे, असे म्हणता येईल. या माध्यमांद्वारे संगीत, चित्रपट, क्रीडा, वृत्तपट इत्यादींचा आस्वाद युवावर्ग घेताना आढळतो. तसेच या माध्यमांद्वारे युवकांचे सामाजिकीकरणही (सोशलायझेशन) होताना दिसते.

## सामाजिकीकरण जुने व नवे

नवीन माध्यमे, नवे तंत्रज्ञान, जागतिकीकरण, विस्तारणाऱ्या बाजारपेठा, वाढता ग्राहकवाद, पर्यावरणाचा गंभीर झालेला प्रश्न अशा अनेकानेक बाबींमुळे अलीकडच्या काळात समाजव्यवस्था अधिक गुंतागुंतीची बनताना दिसते. या व्यामिश्र समाजव्यवस्थेत तरुणांच्या सामाजिकीकरणाची प्रक्रिया अभ्यासणे एक औत्सुक्याचा विषय आहे. समाजशास्त्राच्या दृष्टिकोणातून विचार करता युवकांचे सामाजिकीकरण होणे म्हणजे युवकांनी समाजजीवनातील नीतीमूल्ये, पद्धती आणि नैतिक शिस्त अंगी बाणवणे व व्यवहारात त्याचे प्रतिबिंब पडणे होय. दुसऱ्या शब्दांत समाजाच्या सांस्कृतिक परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजिकीकरण होय. सामाजिकीकरणाची प्रक्रिया तीन मार्गांनी घडून येते. पहिला मार्ग म्हणजे आधीच्या पिढीतील पालकांनी सांगायचे व तरुण पिढीने तसे ऐकायचे. अधिकारशाहीकडे झुकणाऱ्या समाजव्यवस्थांमध्ये सामाजिकीकरण हे एकाच दिशेने घडते. दुसऱ्या मार्गाने घडून येणारी प्रक्रिया अधिक प्रमाणात आढळते असे दिसते. या मार्गात आपल्या समवयस्कांकडून आणि शिक्षकांकडून, परिचितांकडून कळतनकळत शिकण्याची संधी तरुणांना उपलब्ध होते व त्यांचे सामाजिकीकरण होत जाते. आजच्या काळाचा संदर्भ पाहता तिसरा मार्गही महत्त्वाचा ठरताना दिसतो. तो म्हणजे युवकांचे सामाजिकीकरण दुसऱ्या मार्गाने होत असतानाच त्यांनाही आपले ज्ञान वाटण्याची संधी मिळते. म्हणजे ही प्रक्रिया घडत असतानाच ज्येष्ठांनाही तरुणांकडून शिकण्याची संधी उपलब्ध होते. समाजव्यवस्थेत वेगाने बदल घडत जातात आणि बदलाच्या प्रक्रियेत प्रत्येक पिढीची भूमिका व त्यांच्यामधील परस्परसंबंध नव्याने आकाराला येत असतात तेव्हा ही प्रक्रिया घडते. या वेळी तरुणांना अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध होत जातात. याच वेळी त्यांच्या क्षमता वाढून त्यांद्वारे समाजजीवनात सहभागी होण्याच्या शक्यताही वाढतात. उदाहरणार्थ, एखाद्या सामाजिक प्रश्नाबाबत ब्लॉगजच्या माध्यमातून चर्चा घडवून आणण्यात अनेकदा युवक आघाडीवर असतात. म्हणजे हे युवक माध्यमांचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी वा ज्ञान मिळविण्यासाठीच करीत नाहीत तर

त्याच्या प्रसारातही ते सहभागी झालेले असतात. या नवमाध्यमातील मजकूर हा त्यांनीच तयार केलेला असू शकतो. याचा अर्थ निर्मितीप्रक्रियेतील त्यांचा सहभागही महत्त्वाचा ठरत असतो. असा सर्व विचार करता युवकांचा सहभाग असलेले एक 'ग्लोबल मीडिया कल्चर' अस्तित्वात येणे ही देखील सामाजिकीकरणाच्या संदर्भात एक उल्लेखनीय घटना ठरते.

टीन-एजर मुले, युवक आणि इंटरनेट हा विषय अलीकडे चर्चेत महत्त्वाचा ठरतो आहे. कारण यांद्वारे काही गैरप्रकारही घडत आहेत. शिवाय हे तरुण तासन्‌तास बटनांशीच खेळत असतात, त्याचा त्यांच्या डोळ्यांवर, हातांच्या-बोटांच्या हालचालींवर परिणाम होतो, त्यांचे व्यायाम व खेळांकडे लक्ष नसते अशी टीका नेहमीच केली जाताना आढळते. तथापि या टीकेला न जुमानता युवकांनी यात मिळविलेले प्राविण्य हे कौतुकाचे ठरते. शिवाय, या तंत्रज्ञानाच्या वापरात विषमता आहे, म्हणजे निम्नउत्पन्न वर्गातील युवकांना याचा लाभ मिळत नाही ही गोष्ट खरीच आहे. पण यावरही उत्तर शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्थानिक भाषांमधून विविध प्रकारचे सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. कारण स्थानिक पातळीवर संवाद साधण्यासाठी स्थानिक भाषेचाच अधिक वापर होत असतो. तथापि, 'युवक' आणि 'ग्लोबल मीडिया कल्चर' याबाबत खूप अभ्यास झाला असल्याचे आढळत नाही. दैनंदिन जीवनातील घडामोडींत या माध्यमांद्वारे युवक कसे सहभागी होतात, याचा अभ्यास करण्याचे प्रयत्न आता चालू आहेत. नवमाध्यमांच्या वापराबाबत अनेक संस्था - संघटनांकडून काही आकडेवारी प्रसिद्ध करण्यात येत असली तरी युवकांची नेमकी भूमिका त्या वापरातून स्पष्ट होतेच असे नाही. अनेकदा असेही आढळते की परप्रांतात/परदेशांत स्थलांतरित झालेले युवक आपल्या मूळच्या/आधीच्या समाजजीवनाशी असलेला संबंध पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी वा त्यात सातत्य राखण्यासाठी या माध्यमांचा उपयोग करतात. माध्यमांचा प्रभाव असलेले 'यूथ कल्चर' हे सामाजिकीकरणाचे एक नवे दालन वा व्यासपीठ म्हणून निर्माण होत आहे, असे सध्या म्हणता येईल.

## सामाजिकीकरण व समवयस्कांचा प्रभाव

समवयस्कांचा प्रभाव आणि युवा ग्राहकाला डोळ्यापुढे ठेवून केलेल्या विविध उत्पादनांच्या जाहिराती या दोन्हींमुळे नव्या काळातील 'यूथ कल्चर'ची जडणघडण प्रामुख्याने होत असल्याचे म्हटले जाते. त्यातही समवयस्कांचा प्रभाव ही बाब अधिक

महत्त्वाची ठरते आहे; कारण, या काळात पालकांची व कुटुंबातील इतर सदस्यांची भूमिका दुय्यम ठरू लागली आहे तसेच त्यांचा प्रभावही कमी होत चालला आहे, असे आढळते. आधीच्या पिढीकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनाद्वारे तरुण पिढीचे सामाजिकीकरण होण्याची प्रक्रिया मागे पडली आहे. काही समाजांमध्ये युवकांसाठी वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण वर्गही आयोजित केले जातात. त्यात व्यक्तिमत्व विकास, विविध कौशल्यांबाबत प्रशिक्षण, नव्या तंत्रज्ञानाची व नव्या समाजव्यवस्थेची ओळख तसेच नोकऱ्यांच्या नव्या संधी इत्यादींबाबत त्यांना माहिती देण्यात येते. त्याचाही प्रभाव त्यांच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेवर होत असतो. बरेचदा असेही घडते की युवकांना अशी माहिती देण्याच्या प्रक्रियेत पालक, शिक्षक स्वत: काही शिकत जातात वा कधी तरुण पिढीकडून काही शिकणे त्यांना भाग पडते. म्हणूनच सामाजिकीकरणाची ही प्रक्रिया एकाच दिशेने (ज्येष्ठांकडून युवकांना मिळणारे मार्गदर्शन) न घडता ती दोन्ही दिशांनी (ज्येष्ठांकडून युवकांना मिळणारे मार्गदर्शन तसेच युवकांकडून नवे काही शिकण्याची ज्येष्ठांना मिळणारी संधी) घडत जाते. त्यामुळे बदलाच्या या प्रक्रियेत जुन्या-नव्या पद्धतींची सरमिसळ होत होत एक 'हायब्रीड यूथ कल्चर' बनताना दिसते. विशेषत: विकसनशील देशांमध्ये याचे प्रमाण अधिक आढळते. पण अशा 'हायब्रीड यूथ कल्चर'च्या संदर्भात देशादेशांमध्ये आणि देशांतर्गत समाजगटांमध्ये वैविध्य असते. प्रौढ व तरुण व्यक्ती तसेच एकूण समाज या बदलांना कसा सामोरा जातो, त्यावर हे वैविध्य आधारित असते. येथे लक्षात घेण्यासारखा महत्त्वाचा मुद्दा असा की, बदलत्या समाजव्यवस्थेत पिढ्यापिढ्यांमधील संबंधाचे स्वरूप बदलते आहे आणि पूर्वीच्या काहीशा हुकुमी असणाऱ्या जुन्या पिढीला काहीसे सौम्य व्हावे लागते आहे. तसेच युवापिढीच्या सामाजिकीकरणावर समवयस्कांचा अधिक प्रभाव पडतो आहे.

## जागतिक व स्थानिक संस्कृती आणि सामाजिकीकरण

समवयस्कांचा प्रभाव आणि 'यूथ कल्चर' या प्राय: स्थानिक बाबी असतात. पण 'स्थानिक' असणे म्हणजे 'जागतिक' नसणे आणि 'जागतिक' असणे म्हणजे 'स्थानिक' नसणे असे नसते. एकाचवेळी 'स्थानिक' आणि 'जागतिक' असणे शक्य आहे. त्यामुळे 'जागनिकीकरण' (ग्लोकलायझेशन) महत्त्वाचे ठरते. 'यूथ कल्चर'ची अशी भूमिका समजून घेणे गरजेचे बनते. कारण, ज्या मूल्यांचा व मतांचा युवकांवर प्रभाव असतो ती त्यांच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून त्यांना मिळालेली असतात.

स्वाभाविकपणे त्या दृष्टिकोणातून ते मिळणाऱ्या माहितीचा विचार करतात व त्याबाबतचे आपले मत बनवितात. सर्वांच्याच बाबतीत असे घडत असते. त्यामुळे माध्यमांद्वारे पुढे येणाऱ्या माहितीबाबत युवकांसह सर्वांचाच असाच संस्कृतीआधारित दृष्टिकोण असतो. हा दृष्टिकोण लक्षात घेऊनच विविध कंपन्या आपली उत्पादने बाजारपेठेत आणतात व त्यांची जाहिरातही लोकमानसाला पटेल अशी करतात. दूरचित्रवाणीच्या काही विशिष्ट मालिका वा कार्यक्रमही असेच स्थानिकतेशी संबंधित असतात. अलीकडच्या काळात मात्र 'जागनिकीकरणा'ची प्रक्रिया घडत असल्याने माध्यमांतील काही कार्यक्रम स्थानिकतेच्या सीमांना पार करू शकतात. कारण अल्प प्रमाणात का होईना 'ग्लोबल यूथ कल्चर' समाजजीवनात प्रवेशते आहे आणि माध्यमांमुळे ते समाजजीवनात स्थिरावण्याच्या प्रक्रियेला वेगही आला आहे. या प्रक्रियेमुळे जुन्या परंपरा व दृष्टिकोण कधीकधी पिछाडीवर पडतात आणि त्याचवेळी नवीन विचार पूर्णपणे स्थिरावलेही नसतात. त्यामुळे समाजजीवनांत एक प्रकारचा ताणही जाणवतो.

आजचे युवक या सर्व बदलांना सामोरे जात असल्याने त्यांच्या वागणुकीतही फरक पडू लागला आहे. त्यामुळे त्यांच्या वयोगटानुसार kidults, adultescents, tweenagers, middle youth असे शब्दप्रयोगही त्यांच्या संदर्भात आताशा वापरात येऊ लागले आहेत. युवकांच्या या बदलत्या मानसिकतेचा फायदा करून घेण्याचा प्रयत्न जागतिक पातळीवरील अनेकानेक कंपन्या करीत असून माध्यमांद्वारे त्या युवा ग्राहकांपर्यंत पोहचत आहेत. त्यामुळे जागतिक बाजारपेठेत एकजिनसीपणा येतो आहे आणि स्थानिकतेचा संदर्भ मागे पडतो आहे किंवा कसे, याचीही चर्चा होत असल्याचे आढळते. पण अशा चर्चेत स्थानिक व जागतिक या दोन्हींचा प्रभाव असलेली 'जागनिकीकरणा'ची संकल्पना लक्षात घेतली जातेच असे नाही. या सर्व बाबींचा विचार करता सध्याच्या काळात एक 'हायब्रीड यूथ कल्चर' आढळते.

माध्यमांमुळे समाजजीवनात बदल घडून येत आहेत त्याप्रमाणेच माध्यमांवरही समाजातील बदलांचा परिणाम होतो आहे. विकसित तसेच विकसनशील देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारची माध्यमे युवकांसाठी उपलब्ध झाली आहेत. वाहिन्यांची संख्या वाढते आहे, इंटरनेटसेवेचा वापर अधिकाधिक नागरिक करू लागले आहेत. विविध प्रकारचे तंत्रज्ञान वेगाने पसरत आहे. इंटरनेटसेवेचा उपयोग करून खेळता येणाऱ्या तसेच इतर काही संगणकीय खेळांनी युवकांना मोठ्या प्रमाणावर आकर्षित केले आहे. विविध वयोगटांसाठी विविध प्रकारचे खेळ उपलब्ध झाले आहेत. मोबाइलमध्ये

इंटरनेटसेवेचा वापर करता येणे, इंटरनेटवरून गाणी डाऊनलोड करणे, ब्लॉग्जद्वारे आपली मते मांडणे इत्यादी माध्यमांमधून युवकांचा प्रसारमाध्यमांशी असलेला संवाद वाढतो आहे. त्यामुळे व्यक्तिगत आवडीनिवडींना महत्त्व प्राप्त झाले असून कुटुंबाने एकत्र बसून काही कार्यक्रमांचा आस्वाद घ्यावा, असे आता अपवादात्मकच घडते. ज्याला त्याला आपल्या फावल्या वेळेत आपल्या आवडीनुसार कार्यक्रम बघायचे वा ऐकायचे असतात. स्वाभाविकच आपली सेवा कोण वापरतो यावर या माध्यमांमधील कार्यक्रमांची रूपरेषा ठरते. अनेक वाहिन्या युवकांसाठी कार्यक्रम तयार करतात तर काही वाहिन्या लहान मुलांसाठी नजराणा घेऊन येतात. स्त्री-प्रेक्षक डोळ्यापुढे ठेवून काही कार्यक्रमांचे प्रक्षेपण केले जाते.

दूरचित्रवाणीवरील बातम्यांमध्येही प्रेक्षकाला आकर्षित करण्याचे प्रयत्न होताना दिसतात. वृत्तवाहिन्यांच्या पसंतीबाबत युवकांमध्ये बरेच वैविध्य आढळते. 'ग्लोबल युथ कल्चर'मध्ये मोडणाऱ्या युवकांची पसंती बीबीसी, व्हॉइस ऑफ अमेरिका व रेडिओ फ्रान्सला अधिक आहे. अमेरिका व इतर काही देशांत वृत्तपत्र वाचणाऱ्या युवकांची संख्या दिवसेंदिवस रोडावत आहे. याच संदर्भात मुले व युवकांसाठी योग्य मजकूर वा योग्य कार्यक्रम माध्यमांमध्ये नसणे आणि त्याबाबत त्यांचे अधिकार याचीही चर्चा व्हावी, असे म्हटले जाऊ लागले आहे. युवकांना त्यांचे मत मांडण्याची संधी मिळावी अन्यथा त्यांच्या मनात आपण प्रवाहाबाहेर असल्याची खंत असते व ते माध्यमांपासून दूर राहू लागतात असे दिसते. राजकारणाबाबतही युवकांच्या मतांना फारशी प्रसिद्धी दिली जात नाही. युवकांची अभिव्यक्ती व त्यांची मते वेगळी असतात, ती समजून घेणे व त्यांना संधी देणे हे गरजेचे आहे, असे मत पुढे आले आहे. या सर्व बाबींचा परिणाम प्रसारमाध्यमांच्या अर्थकारणावरही होतो आहे. त्यामुळे माध्यमांतील काही कंपन्या एकत्र येऊन ग्राहकांसाठी सेवा देण्याचा प्रयत्न करू लागल्या आहेत.

## माध्यमांबाबत युवकांचे अधिकार

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या या युगात युवकांनी माहितीपासून वंचित राहणे योग्य नाही, आणि त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने त्यांना योग्य ती माहिती मिळालीही पाहिजे. आता 'योग्य ती माहिती कोणती', हा चर्चेचा विषय बनू शकतो. किंबहुना तो बनला आहेच. युवकांना जास्त सुरक्षित वातावरणात ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला तर ते योग्य माहितीपासून वंचित राहू शकतात आणि सर्व प्रकारची माहिती उपलब्ध झाली तर युवकांवर त्याचे दुष्परिणामही होऊ शकतात. त्यामुळे या संदर्भात

नेमकी भूमिका ठरविणे अवघड बनले आहे. विशेषतः इंटरनेटच्याबाबतीत हा मुद्दा प्रकर्षाने चर्चिला जातो. काय चांगले व काय वाईट या दोन्हींची माहिती युवकांना देणे योग्य ठरेल असेही म्हटले जाते. काही विशिष्ट माहिती उपलब्ध होऊ नये यासाठी काही विशिष्ट तंत्रज्ञानही बनविले जात आहे. या सर्व प्रक्रियेचा वेग पाहता त्याबाबत लवकर निर्णय घेणे गरजेचे ठरेल, पण अद्याप बरीच मजल गाठायची आहे, एवढेच सध्या म्हणता येते. इंटरनेट सेवेचा वापर करून ई-मेल, चॅटिंग व ब्लॉग्ज इत्यादींच्या माध्यमातून युवकांचा माध्यमांमधील संवाद वाढला आहे. अशा प्रकारचा काही मजकूर त्यांनाही तयार करून इंटरनेटवर पाठविता येतो. तर इंटरनेटवरील विकिपीडियासारख्या दुसऱ्या व्यक्तीने तयार केलेल्या कोशात त्यांना स्वतःला काही भरही घालता येते. त्यामुळे निर्मितीप्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढला असून तो महत्त्वाचा ठरला आहे. भविष्यातही असा सहभाग वाढणारच आहे. त्यामुळे इंटरनेट सेवेचा विचार करता या माध्यमाच्या संदर्भात लोकशाहीकरणाची प्रक्रिया चालू होण्याच्या संधी निर्माण झाल्या आहेत, असे दिसते. रेडिओवरील काही कार्यक्रमांमध्येही युवकांचा सहभाग वाढू लागल्याचे म्हटले जाते. इंटरनेटबाबत असे घडू शकले तरी इतर माध्यमांची याबाबतची भूमिका काय राहील वा काय असावी, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

अशा प्रकारे तरुणांचा सहभाग वाढणे ही चांगली बाब असली तरी सहभागाबरोबर जबाबदारीही येते. अशी जबाबदारी पेलण्यासाठी युवकांनी तयार असले पाहिजे. यादृष्टीने त्यांचे शिक्षण-प्रशिक्षण होणे गरजेचे आहे. युवकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंध येणाऱ्या अनेक विषयांबाबत त्यांना मात मांडायचे असते, विविध प्रकारची माहिती जाणून घ्यायची असते, असे एका सर्वेक्षणाद्वारे आढळते. या दृष्टीने त्यांना समाजजीवनात सहभागी करून घेणे गरजेचे ठरते. म्हणजे, मत मांडण्यासाठी त्यांची पार्श्वभूमी तयार झालेली असली पाहिजे. त्यांना अभिव्यक्ती करण्याची संधी मिळाली पाहिजे. इंटरनेटच्या माध्यमातून अशी संधी मिळत असल्याने विकसनशील देशांमधील युवकांपर्यंत हे तंत्रज्ञान पोहचणे आवश्यक आहे. स्थानिक भाषेचे महत्त्व व वापर पाहता या संधी स्थानिक भाषेतूनही उपलब्ध व्हायला हव्यात. याचबरोबर जागतिकीकरणाच्या प्रवाहात सामील होण्याच्या दृष्टीने त्यांना इंग्रजी भाषाही शिकावी/ शिकवावी लागणार आहे. माध्यमे, त्यांचा समाजजीवनाशी असणारा संबंध, त्यांद्वारे घडून येणारी समाजिकीकरणाची प्रक्रिया आणि युवकांचा सहभाग व त्यांचे अधिकार याची चर्चा व कृती याला आता वेग यायला हवा. ✿✿

# युवा सहभागाच्या दिशेने....

नव्या युगाची धुरा पेलण्याची क्षमता असणाऱ्या युवकांची - विशेषतः विकसनशील देशांमधील युवकांची - एकूण परिस्थिती समाधानकारक आहे, असे आढळत नाही. उदाहरणार्थ, जागतिक पातळीवर विचार करता, नव्या शतकाच्या पहिल्या दशकाच्या मध्यात (२००५) युवकांच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे २० कोटी युवक गरिबीत राहत होते. १३ कोटींपेक्षा अधिक युवक अशिक्षित होते. सुमारे नऊ कोटी युवक बेरोजगार होते आणि किमान एक कोटी युवकांना 'एचआयव्ही'ची बाधा झालेली होती. शिवाय विकसनशील देशांमधील कोट्यवधी मुले कुपोषणग्रस्त होती. असे असताना सहस्रक विकास उद्दिष्टांत (मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स) युवकांना अग्रक्रम मिळणे उचित ठरते. युवकांच्या संदर्भात 'वर्ल्ड प्रोग्रॅम ऑफ ॲक्शन फॉर यूथ' असा एक उपक्रम राष्ट्रसंघातर्फे १९९५ मध्ये हाती घेण्यात आला होता. या उपक्रमाची दहा वर्षे २००५मध्ये पूर्ण झाली. युवा धोरण आखण्याचा आंतरराष्ट्रीय पातळीवरील हा पहिलाच प्रयत्न होता. या धोरणात प्राधान्यक्रमानुसार दहा मुद्दे मांडण्यात आले होते. अनेक देशांमधील सरकारांनी या युवा धोरणाचा संदर्भ घेऊन आपापल्या देशांत अशी काही धोरणे आखली व उपक्रम राबविले. मग, या नंतरच्या काळात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला. तसेच महिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सतत नवनवीन बदल होत गेले. या दोहोंचा परिणाम युवकांवर होणे स्वाभाविकच ठरले. पठडीबद्ध शिक्षणाबरोबरच इतर नवशिक्षणाच्या व विविध कौशल्ये शिकण्याच्या संधी मिळालेल्या युवकांवर या दोन्हींचे परिणाम चांगले ठरल्याचे दिसते. मात्र, बहुतांश युवकांपर्यंत हे चांगले परिणाम पोहचत नसल्याचे चित्र पुढे आले आहे. शिवाय देशादेशांत आणि देशांतर्गत विविध समाजगटांमध्ये आर्थिक-सामाजिक विषमता वाढतानाच आढळते. या परिस्थितीत, 'युवकांची सद्यःस्थिती व त्यांच्यासमोरील आव्हाने' हा राष्ट्रसंघासाठी सर्वंकष अभ्यासाचा विषय बनला.

या अभ्यासात पर्यावरणाची समस्या आणि युवक या विषयाला प्राधान्य देण्यात आले. कारण आज पर्यावरणाचा प्रश्न अतिशय गंभीर बनला आहे. शिवाय,

भविष्यकाळाचा विचार करता पर्यावरणाच्या हानीचे परिणाम युवकांच्या थेट जीवनाशीच भिडणारे आहेत, ते त्यांनाच भोगावे लागणार आहेत. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन अनेक युवक आज पर्यावरणरक्षणात रस घेताना दिसतात. काही ठिकाणी तर ते कृतिशील झाल्याचे दिसते आहे. राष्ट्रसंघातर्फे १९९२मध्ये 'पर्यावरण आणि विकास' या विषयावर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते तेव्हापासून पर्यावरणविषयक उपक्रमांतील युवकांच्या सहभागाला प्रामुख्याने सुरुवात झालेली दिसते. त्या नंतर जोहान्सबर्ग येथे २००२ मध्ये 'सातत्यशील विकास किंवा चिरंजीवी विकास' या विषयावरील परिषदेत युवकांचा मोठा सहभाग राहिला. 'वर्ल्ड प्रोग्रॅम ऑफ ॲक्शन फॉर यूथ'ने मान्य केलेले प्रस्ताव जोहान्सबर्ग येथील परिषदेत आग्रहाने मांडण्यात आले व त्यांची अंमलबजावणी व्हावी, यासाठीही प्रयत्न करण्यात आले. या नंतर शालेय पातळीवर एक वेगळा विषय म्हणून पर्यावरणाचा समावेश करण्यात आला. राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेत २००५-२०१४ हे 'सातत्यशील विकासाच्या शिक्षणा'चे दशक असल्याचे घोषित करण्यात आले. अलीकडच्या काळात शालेय पातळीवर तसेच औपचारिक व अनौपचारिक कार्यक्रमांमधूनही पर्यावरणाच्या विषयाला महत्त्व प्राप्त होऊ लागल्याचे दिसते.

'वर्ल्ड प्रोग्रॅम ऑफ ॲक्शन फॉर यूथ'च्या योजनांप्रमाणे पर्यावरणाच्या रक्षणासाठी युवकांचा स्थानिक तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत सर्व स्तरांवरील सहभाग वाढायला हवा. दैनंदिन जीवनात पर्यावरणीय मूल्यांचा अंगिकार करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. निर्णयप्रक्रियेतील युवकांचा सहभाग वाढून त्यांच्याकरवी पर्यावरणाचे विविध प्रकल्प राबविले जायला हवेत. या दृष्टीने सरकारी तसेच निमसरकारी संस्था आणि स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत युवक कृतिशील झाले तर ते उपयुक्त ठरते. या संदर्भात 'युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेन्ट प्रोग्रॅम'तर्फे (UNEP) २००३ मध्ये 'टुंझा यूथ स्ट्रॅटेजी' असा एक उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. पर्यावरणाचे रक्षण, संवर्धन आणि सातत्यशील विकास याचा विचार करून जोहान्सबर्ग येथील ठरावांची अंमलबजावणी करणे आणि त्यात सर्व पातळ्यांवर युवकांचा सहभाग वाढविणे, त्याचे पुनर्विलोकन (review) करणे असे तेव्हा ठरविण्यात आले होते. त्या काळी पर्यावरणाचा प्रश्न विविध प्रसारमाध्यमांनी जास्त प्रमाणात उचलून धरलेला नव्हता, असे 'वर्ल्ड प्रोग्रॅम ऑफ ॲक्शन फॉर यूथ'च्या लक्षात आले. त्यामुळे या संबंधीची माहिती युवकांनीच वेगवेगळ्या मार्गांनी (इंटरनेट, ई-मेल, ब्लॉग्ज, मोबाइल फोन,

डिजिटल फिल्म्स इत्यादी) समाजातील वेगवेगळ्या गटांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. नवीन तंत्रज्ञान चटकन आत्मसात करणारी तरुण पिढी पर्यावरणाच्या प्रश्नावर जागरुकता निर्माण करण्यासाठी या नवमाध्यमांवर आणि व्यक्तिगत संपर्कावर अधिक भर देत असल्याचे आढळते.

आजच्या जगात तंत्रज्ञानविषयक बदल वेगाने होत असले तरी ते बदल सर्व देशांमधील सर्व समाजघटकांपर्यंत पोहचलेले नाहीत. त्याचप्रमाणे, विविध स्तरांमधील सर्व युवकांपर्यंतही ते पोहचलेले नाहीत. तरीदेखील ज्यांना ज्यांना या तंत्रज्ञानाचा उपयोग करणे शक्य आहे ते त्याचा वापर करताना दिसतात, हीदेखील वस्तुस्थिती आहे. जागतिकीकरणाच्या या काळात तंत्रज्ञानविषयक विषमता कमी करण्याचेही प्रयत्न काही प्रमाणात होताना दिसतात. भारतातील 'आयटीसी'ने ग्रामीण भागांत नवतंत्रज्ञान पोहचविण्याचा 'ई -चौपाल'चा उपक्रम यशस्वी झाला आहे (पण तो प्रामुख्याने ग्रामीण भागांतील नागरिकांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी आहे).

## युवकांचा 'फावला वेळ'

युवकांचा दैनंदिन जीवनातील बहुतांश वेळ हा शिक्षणासाठी वा अर्थार्जनासाठी खर्च होतो, असे गृहित धरून दिवसभरात फावला वेळ मिळतो तेव्हा हे युवक काय करीत असावेत, याचाही शोध या अभ्यासादरम्यान घेण्यात आला. गेल्या दशकापर्यंत फावला वेळ किंवा leisure time याकडे बघण्याचा एक परंपरागत दृष्टिकोण होता. या वेळात करता येणाऱ्या गोष्टी गांभीर्याने करायच्या नाहीत किंवा गांभीर्याने करायच्या गोष्टी फावल्या वेळेत करायच्या नाहीत, असे बऱ्याच प्रमाणात मानले जात होते. पण आता हा दृष्टिकोण बदलला असून फावल्या वेळात अनेक गोष्टी करणे शक्य आहे, असे युवकांचे/त्यांच्या पालकांचे मत बनले आहे. फावल्या वेळाचा उपयोग व्यक्तिमत्वविकासासाठी, इतर काही कौशल्ये शिकण्यासाठी, सामाजिक कार्यासाठी आणि अर्थार्जनासाठी करणे शक्य आहे, तेव्हा तो तसा केला जावा यासाठी अनेक जण प्रयत्नशील असल्याचे दिसते. असे प्रयत्न होताना आढळतात कारण, फावल्या वेळेचा सदुपयोग न झाल्यास मादक पदार्थांच्या आहारी जाण्याचे, दारू, सिगारेट वा इतर व्यसनांकडे वळण्याचे तसेच वाममार्गाकडे जाण्याचे आणि हिंसाचाराला बळी पडण्याचे युवकांचे प्रमाण वाढण्याची शक्यता अधिक असते.

कधीकधी विविध देशांमधील सरकारे खेळ, कला आणि इतर मनोरंजनाची साधने यांवरील अनुदानात कपात करतात. त्यामुळे युवकांनी फावल्या वेळेत करायच्या

गोष्टींवर बंधने येतात. अशा गोष्टीं महागड्या असल्याने त्यासाठी युवकांना खाजगी सेवांवर अवलंबून राहता येत नाही. मग शाळा-महाविद्यालयांचे तास संपल्यानंतर फावल्या वेळातही काही न करता आल्याने आणि आई-वडील कामाला गेल्याने अनेक मुले घरी एकटीच असतात. अशी मुले कंटाळून वाममार्गाला जाऊ शकतात. पण काही पालक व मुले या वेळेचा चांगला उपयोग करतात. तर काही युवकच एकत्र येऊन समाजोपयोगी कार्य करताना दिसतात. पण त्यांना निधी, भेटण्यासाठी जागा आणि मार्गदर्शन तसेच इतर मदत मिळतेच असे नाही. त्यामुळे शहरीकरणाची प्रक्रिया वेग घेत असताना नियोजनाच्या वेळीच युवकांच्या फावल्या वेळेबाबतचा विचार व्हावा, असे मत पुढे आले आहे. ग्रामीण भागांतील युवकांनाही अशा संधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारला व स्वयंसेवी संस्थांना पुढाकार घेता येईल. तरुणपणी जी मुले चांगल्या कामाकडे वळतात तीच मोठेपणीही कृतिशील राहतात, असे काही अभ्यासांवरून स्पष्ट झाले आहे.

जे युवक स्वेच्छेने असे काही मार्ग स्वीकारतात त्यांची शैक्षणिक प्रगती चांगली होण्यास व मन:स्वास्थ्य टिकून राहण्यास मदत होते. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे या शतकाच्या सुरुवातीचे म्हणजे २००१ हे वर्ष 'इंटरनॅशनल इयर ऑफ व्हॉलेंटियर्स' असे घोषित करण्यात आले होते. स्वेच्छाकार्य, त्यातील युवकांची भूमिका आणि सहभाग यांबाबतचा दृष्टिकोण त्या नंतर व्यापक बनला. फावल्या वेळेचा नीट उपयोग केल्यास कितीतरी व्यापक आणि महत्त्वाचे असे कार्य युवकांकडून स्वेच्छाकार्याद्वारे घडू शकते. विकसनशील देशांमध्ये विविध कामांच्या संदर्भात युवकांच्या सर्व प्रकारच्या सहभागाची गरज असून ते हे काम चांगल्या प्रकारे करू शकतात, असे या वेळी स्पष्ट झाले. त्यामुळे सहस्रक विकास उद्दिष्टे गाठण्यासाठी २००१ पासून युवकांच्या कार्याला मिळालेली गती टिकून राहावी यासाठी प्रयत्नशील राहण्याची गरज आहे.

युवकांच्या फावल्या वेळेचा विचार करता असे लक्षात येते की माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीमुळेही या वेळेचा उपयोग कसा करावा याचे काही गणित बदलले जात आहे. उदाहरणार्थ, ज्या युवकांपर्यंत हे तंत्रज्ञान पोहचले आहे त्यांची सामाजिकता ब्लॉगिंग, ई-मेल, एसएमएस व ऑनलाइन मीटिंग्ज इत्यादींद्वारे दिसून येते. कला व मनोरंजनाचा विचार करता फावल्या वेळात इंटरनेटवरून संगीत डाउनलोड करणे वा गेम्स खेळणे यात काही तरुण मंडळी रमलेली दिसतात. त्यामुळे काही देशांमध्ये मैदानी खेळ व तत्सम व्यायाम हे विरंगुळ्याचे प्रकार पिछाडीवर पडल्याचे

आढळते. नव्या तंत्रज्ञानामुळे individualised leisure (व्यक्तिकेंद्री विरंगुळा) असा प्रकार अस्तित्वात आल्याचे म्हणता येईल.

**निर्णयप्रक्रियेतील सहभाग**

विकासासाठी प्रगतीशील अशी धोरणे ठरविणे, ती मान्य करवून घेणे, त्यांची अंमलबजावणी करणे आणि शेवटी त्याचे मूल्यमापन करणे या सर्व प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढण्याला आता महत्त्व देण्यात येत असून गेल्या दशकांत याला अधिकाधिक मान्यता मिळत गेली आहे. या प्रक्रियांमध्ये सहभाग असला की मानवाधिकार आणि लोकशाही यासंबंधीची युवकांची समज व आकलन वाढून त्यांची त्यासाठीची बांधिलकीही वाढते. युवकांचा असा सहभाग वाढणे हे त्यांच्या व्यक्तिमत्वविकासासाठी तर महत्त्वाचे आहेच, त्याशिवाय ते समाजासाठीही उपयुक्त व गरजेचे आहे. मात्र दरवेळी हा सहभाग प्रभावी व परिणामकारक ठरण्याच्या दृष्टीने व्यवहारांत सुयोग्य कृती घडतेच असे नाही. म्हणजे केवळ एक उपचार म्हणून कधी हा सहभाग मुद्दाम घडवून आणला जाऊ शकतो, तर कधी तो आमिषाने (विशिष्ट कामासाठी ठरवून असा) घेतला जाऊ शकतो. तरुणांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोण बदलला म्हणजे तरुणपिढी केवळ उच्छृंखल नाही, ती समंजस आहे, समाजाचा व देशाचा विचार ती करू शकते हे समजून घेऊन समाजाने युवकांना अधिक प्रमाणात संधी दिली तर युवकांचा सहभाग अधिक रचनात्मक होऊ शकेल. असे काही बदल घडून येण्यासाठी युवकांच्या क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने त्यांचे प्रशिक्षण करण्यासाठी योजना व त्यासाठी पुरेसा निधी आणि इतर व्यवस्था, आधीची पिढी व तरुण पिढी यांच्यात सुसंवाद, सुयोग्य संघटनात्मक रचना आणि तरुण पिढीचे म्हणणे व दृष्टिकोण समजून घेण्याची मानसिकता इत्यादी बाबी महत्त्वाच्या ठरतात. तसेच युवकांचा सहभाग आयत्या वेळी व तात्पुरत्या कामांसाठी न घेता त्याला प्रथमपासून विशिष्ट दिशा असणे आवश्यक ठरते. तरुणी आणि स्त्रिया यांचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग वाढण्याच्या दृष्टीने सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक अडथळे ओलांडण्यासाठी अधिक परिश्रम घ्यावे लागणार आहेत.

बदललेली सामाजिक व आर्थिक परिस्थिती, युवकांची भूमिका, त्यांचे दृष्टिकोण आणि युवक चळवळींची कार्यपद्धती व रचना अशा अनेकानेक बाबींचा विचार युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी करणे क्रमप्राप्त ठरते. साधारणतः असे आढळते की अनेक देशांमध्ये स्थानिक, प्रांतीय आणि राष्ट्रीय पातळीवर युवकांच्या संघटना, मंडळे असतात. युवकांचा राजकीय आणि नागरी सहभाग त्यांच्याद्वारे दिसून येतो. सामाजिक

व राजकीय स्थित्यंतरे घडवून आणण्यात अनेक देशांमधील विद्यार्थी संघटनांचा सहभागही राहिला आहे. त्यामुळे नजीकच्या भविष्यातही लोकशाहीकरणासाठी आणि सामाजिक सुधारणा राबविण्यासाठी विद्यार्थी संघटनांचा सहभाग कदाचित महत्त्वाचा ठरू शकेल. युवकांचा सहभाग आणि त्यांची भूमिका याचे महत्त्व अधोरेखित करतानाच त्यांच्या सहभागाच्या कल्पना बदलल्या आहेत याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अनेकदा असेही आढळते की आजकालच्या युवकांना राजकारणाचे आकर्षण वाटत नाही. किंबहुना त्याबाबत त्यांची उदासीनताच दिसून येते. मात्र, असे असतानाही पर्यावरणरक्षणात वा इतर काही आवडीच्या सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग असतो. ते आपली मते मांडण्यातही अग्रेसर असतात. पण ठरावीक साच्यातील युवा चळवळी वा संघटना यांत सहभागी होण्यास ते उत्सुक नसतात. म्हणजे दुसऱ्या शब्दांत ते काही विशिष्ट मुद्यांसाठी वा विशिष्ट सेवा म्हणून कार्य करण्यास उत्सुक असतात. म्हणजे त्यांची सामाजिकीकरणाच्या दिशेने जाण्याची मानसिक तयारी झालेली असते व त्यासाठी ते कृतिशीलही होऊ इच्छितात असे स्पष्ट होते. म्हणून त्यांचा सहभाग वाढण्यासाठी त्यांना विविध क्षेत्रांत कार्य करण्याच्या संधी उपलब्ध होणे गरजेचे आहे.

## पिढ्यांमधील सुसंवाद गरजेचा

आणखी एक बाब येथे लक्षात घेतली पाहिजे. ती म्हणजे जागतिक पातळीवर ज्येष्ठ नागरिकांची संख्याही वाढते आहे. चौदा वर्षांखालील मुले आणि ज्येष्ठ नागरिकांची संख्या यांच्यात कदाचित बरोबरीही होऊ शकेल. त्या दृष्टीने पिढ्यांमधील सुसंवाद वाढणे गरजेचे ठरेल. विकसित देशांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढताना दिसते आहे. म्हणजे हे देश वयोवृद्ध समाजाकडे वाटचाल करू लागले आहेत. विकसनशील देशांमध्येही असेच घडते आहे. २००५ मधील आकडेवारीनुसार, जगभरातील दर १० ज्येष्ठ नागरिकांमधील ६ ज्येष्ठ नागरिक विकसनशील देशांत राहत होते. मात्र २०५०मध्ये हेच प्रमाण दर १० ज्येष्ठ नागरिकांमागे ८ ज्येष्ठ नागरिक असे असण्याची शक्यता अधिक आहे. २००० ते २०५० या काळात सरासरी आयुर्मान ६५ वर्षांवरून ७४ वर्षे इतके वाढेल असा अंदाज आहे. त्याच काळात ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण १० टक्क्यां-वरून २१ टक्के इतके वाढण्याची शक्यता आहे. तसेच १४ वर्षांखालील मुलांचे प्रमाण ३० टक्क्यांवरून २० टक्के इतके कमी होण्याची शक्यता आहे. म्हणजे, १४ वर्षांखालील मुलांची व ६० वर्षांवरील ज्येष्ठांची संख्या जवळपास सारखीच असू शकेल असाही अभ्यासकांचा अंदाज आहे. संख्यात्मक वाढ झाल्याने ज्येष्ठांची,

वृद्धांची काळजी हा एक सामाजिक प्रश्न बनणार आहे. तसेच लहान मुलांचे संगोपन व त्यासाठी द्यावा लागणारा वेळ हाही प्रश्न समाजव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असेल. मग सर्वांची सोय लक्षात घेऊन तीन ते चार पिढ्यांना एकत्र नांदावे लागेल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत 'जनरेशन गॅप' असली तरी सर्व पिढ्यांमध्ये सुसंवाद घडणे गरजेचे ठरेल. युवकांचा विकास व विविध स्तरांवरील निर्णयप्रक्रियेतील सहभाग या दृष्टीनेही गरजेचा ठरणार आहे.

या संदर्भात एक लक्षात घेतले पाहिजे की, अलीकडच्या काळात विभक्त कुटुंबे आकाराला येत आहेत. समाजव्यवस्था व्यक्तिकेंद्री बनत असल्याने कुटुंबव्यवस्थेची घडी बदलली जात आहे. एकीकडे घरातील संवाद खुंटतो आहे तर दुसरीकडे नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून युवकांचा काही विशिष्ट गटांशी असलेला संवाद वाढतो आहे, तंत्रज्ञानापासून वंचित असलेले तरुणही तंत्रज्ञानाकडे आकर्षित होत आहेत, तर काही मात्र प्रवाहाबाहेरच राहिले आहेत, असे सध्याचे चित्र आहे. समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत युवकांचा सहभाग वाढण्यासाठी ही विषमता दूर करणे गरजेचे ठरणार आहे. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पिढ्यांमधील सुसंवाद हा समाज-संस्कृतींशीही संबंधित असतो. त्यामुळे सुसंवाद वाढण्यास साहाय्य करणारी अशी सांस्कृतिक मूल्ये स्वीकारणेही गरजेचे ठरेल. जागतिकीकरणाच्या या काळात कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिती बदलत असताना युवकांची आर्थिक परिस्थिती चांगली असणेही आवश्यक ठरणार आहे. या सर्व अभ्यासांमधून ढोबळ विवेचन समोर येते. प्रत्येक देशातील विविध समाजगटांमधील युवकांची व ज्येष्ठांची नेमकी स्थिती याद्वारे स्पष्ट होतेच असे नाही.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत व माहिती-तंत्रज्ञानाच्या या काळात बदलते समाजजीवन लक्षात घेऊन समाजजीवनाच्या अनेकानेक क्षेत्रांत युवकांचा सहभाग वाढणे ही एक आवश्यक बाब बनणार आहे. भविष्याच्या दृष्टिकोणातून युवकांकडे बघण्याबरोबरच ते आजचेही नागरिक आहेत हे ध्यानात घेतले जाणे आवश्यक ठरेल. यासाठी समाजाची मानसिकता तशी घडावी/घडवावी लागेल. यासाठी शिक्षणाचा, शिक्षणपद्धतीचा सर्वंकष विचार करणेही उचित ठरावे. मग, विविध संस्था-संघटना, कंपन्या अशा अनेक ठिकाणी अशा शिक्षण-प्रशिक्षणाच्या संधी युवकांना उपलब्ध करून द्याव्या लागतील. या सुवर्णसंधींचा उपयोग करणे हे मात्र युवकांच्याच हाती असणार आहे. ✿✿

# ANNOUNCEMENT

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

is pleased to announce the following scheme recently introduced for subscription of the ***Journal of Indian School of Political Economy (JISPE)*** for the Block Period of Three and Five years at a substantial concession resulting in huge savings (up to 33.3%) to the new as well as existing subscribers as under, provided that the subscription amount is remitted in lump-sum on or before 31st March 2008.

| ***Subscription Category*** | ***Yearly Subscription*** | ***Three Year subscription*** | ***Five Year Subscription*** |
|---|---|---|---|
| *Universities & Institutes* | *Rs. 600/-* | *Rs. 1500* | *Rs. 2000/- Plus ** |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 300/-*** | ***Rs. 1000/-*** |
| *Individuals & Colleges* | *Rs. 300/-* | *Rs. 750/-* | *Rs. 1000/-* |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 150/-*** | ***Rs. 500/-*** |
| *Savings Per cent* | *Nil* | *16.2%* | *33.3%* |

* Statistical supplement to the special issue of the JISPE on 'Political Parties and Election in Indian States : 1990-2003' comprising 335 pages and costing Rs.325/- absolutely free till stocks last.

**For more details write or email to:**

The Administrative Officer,
Indian School of Political Economy,
'Arthabodh', 968/21-22, Senapati Bapat Road,
Pune 411016

Email : ispe@vsnl.net
Fax - 25657697

Phone - 25657132
- 25657210

# आव्हान गरिबी व बेरोजगारीचे

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत परस्परांत गुंफल्या गेलेल्या बाजारपेठांमुळे देशादेशांचे परस्परावलंबन वाढले आहे. हे परस्परावलंबन पुन्हा सर्वस्पर्शी आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यापारी, औद्योगिक.... जीवनाचे कोणतेही अंग आज त्यातून वगळले गेलेले दिसत नाही. आर्थिक विकासाच्या वाटचालीदरम्यान जगातील अनेक देशांना या परस्परावलंबनाचा टेकू पूरक-उपकारक ठरला आहे. पूर्व आशियाई देश हे या वास्तवाचे आदर्श उदाहरण ठरावे. वेगवान आर्थिक विकासाद्वारे केवळ एकाच दशकभरादरम्यान या देशांमधील तब्बल २० कोटी नागरिक गरिबीच्या खाईतून वर उचलले गेले. परंतु, याच चित्राची दुसरी बाजूही नाकारण्यात अर्थ नाही. जागतिकीकरणाच्या लाभांपासून वंचित राहिलेल्यांचे प्रमाणही मोठे आहे. देशोदेशीच्या आर्थिक प्रगतीतील तफावत वाढतानाही दिसते. पूर्वाश्रमीच्या सोव्हिएत संघराज्यातील देश, पश्चिम आशिया तसेच आफ्रिकेच्या सहारा परिसरातील अदमासे २०० कोटी लोकांकडे जागतिकीकरणाच्या लाभांचे वारे आजतागायत फिरकलेलेदेखील नाहीत. आर्थिक प्रगतीचा घटता वेग, वाढती बेरोजगारी, अल्प उत्पन्न, निकृष्ट शिक्षण, अपुऱ्या आरोग्य सुविधा यांसारख्या अनेकानेक आर्थिक तसेच सामाजिक अरिष्टांचा सामना या टापूतील जनसमूहांना आज करावा लागत आहे.

जागतिकीकरणाच्या झपाट्याद्वारे युवकांसमोर खुले झालेले संधींचे दरवाजे आणि त्याच वेळी त्याच दरवाजांमागून डोकविणारी आव्हाने यांचे विश्लेषण या साऱ्या पार्श्वभूमीवर करावयास हवे. अन्य समाजघटकांच्या तुलनेत तरुणांच्या ठायी काही क्षमता या निसर्गदत्तच आढळून येतात. एक तर वय त्यांना अनुकूल असते. अंगात ताकद असते. अपार उत्सुकता शिगोशीग भरलेले मन तरुण शरीरात वास करीत असते. नवनव्या गोष्टी चट्कन आत्मसात करून बदललेले वातावरण पचनी पाडण्याइतपत ते लवचीकही असते. परिणामी, जगभरात सर्वत्रच वाहत असलेल्या उदारीकरणाच्या प्रवाहांद्वारे विस्तारत असलेल्या नवनवीन संधींचा लाभ हातोहात उठविण्यासाठी हा तरुण वर्ग कदाचित सर्वाधिक सक्षम म्हणूनच गणावा लागेल.

त्यातच, आजच्या २१ व्या शतकातील तरूण अन्य कित्येक बाबतींतही एका परीने सुस्थितीतच आहे. तरु णांमधील शिक्षणाचे सरासरी प्रमाण आज जगभरच सर्वत्र चांगले उंचावलेले आहे. माहिती तंत्रज्ञानासारख्या आधुनिक ज्ञान-तंत्रज्ञान शाखेचे पुरेसे प्रशिक्षण त्याला मिळालेले आहे, असे प्रशिक्षण मिळण्याच्या सुविधाही विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. अध्ययन तसेच/अथवा व्यवसायाच्या निमित्ताने आजचा तरू ण जगभर सतत भ्रमण करीत असतो. परिणामी, गेल्या पिढ्यांमधील युवकांच्या तुलनेत आजच्या तरु णाला तारु ण्याच्या उंबरठ्यावरच मिळणारे 'एक्स्पोजर' किती तरी अधिक आणि किती तरी वैविध्यपूर्ण असे आहे. त्यामुळे, आजच्या एकमेकांत गुंफल्या गेलेल्या जगातील नवसमृद्धीचे अग्रहक्काचे भागीदार तेच ठरावेत, हे ओघानेच येते.

परंतु, हे चित्रही सर्वसमावेशक आहे असे अनुमान यावरून काढणे हे दिशाभूल करणारे ठरेल. कारण, विकसनशील देशांमधील वास्तव यापेक्षा खूपच निराळे आहे. जग एकत्र येण्याने पृष्ठभागावर आलेल्या संधींचे सोने करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक क्षमतांचा अभाव असणारे युवा विकसनशील देशांमध्ये ठायीठायी आढळतात. आधुनिकीकरणापासून हे तरूण आजही वंचितच आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची दरी त्यांच्याबाबतीत अनुल्लंघ्यच शाबीत होते आहे. जागतिकीकरणापाठोपाठ येणाऱ्या सांस्कृतिक खळबळाटात आपल्या संस्कृतीची ओळख वा आत्मखूण आणि आपापल्या स्थानिक परंपरांचे संचित समूळ झाकोळून तर जाणार नाही ना, या भयगंडाने वा चिंतेने हे तरूण ग्रासलेले दिसतात. या तरु णाईला आश्वस्त बनविणारी, त्यांना आधाराचा हात पुढे करणारी धोरणे व कार्यक्रम आखणे व त्यांची कार्यक्षम कार्यवाही करणे, या तरु णांना माहिती तंत्रज्ञान तसेच माहिती तंत्रज्ञानाधारित सेवांचा टेकू पुरविणे, जागतिकीकरणाच्या माध्यमातून रु ंदावलेल्या प्रगतिप्रवाहांमध्ये उतरून त्या प्रवाहांचा लाभ उठविण्याच्या क्षमता त्यांच्या अंगी निर्माण व्हाव्यात यासाठी पूरक अशी पावले उचलणे, हे एकंदरच विकसनशील राष्ट्रांमधील धोरणकर्त्यांसमोरील आजघडीचे मुख्य आव्हान आहे.

जागतिकीकरणामुळे श्रमांच्या बाजारपेठेतही मूलभूत स्वरु पाचे बदल घडून येत आहेत. रोजगाराचे रूपही पालटताना दिसते. नवीन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने अंगमेहनतीच्या कामांमध्ये बचत घडवून आणली आहे. परिणामी, अकुशल, अर्धकुशल रोजगार संधींचा जगभरच विलय होताना दिसतो. त्यामुळे, उत्पादनाच्या या प्रांगणातील रोजगाराचा संकोच होतो आहे. केवळ वस्तुनिर्मिती उद्योगच नव्हे तर सेवा उद्योगांतही

हाच प्रकार दृग्गोचर होतो. सातत्यशील राखलेल्या जोमदार आर्थिक विकासामुळे उभ्या जगालाच विस्मयकारक वाटणारा चीनही यास अपवाद नाही. एकीकडे, चीनच्या शेती तसेच एकंदरच प्राथमिक क्षेत्रातून श्रमिक आता उद्योग तसेच सेवा क्षेत्रांकडे उपजीविकेसाठी वळत आहेत. चीनमधील तरुण पिढी शेतीमध्येच गुंतून राहण्यास फारशी उत्सुक नाही. दुसरीकडे चीनच्या सरकारी उद्योगांची फेररचना सुरू आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे उदारीकरण वेगाने होत असल्याने जागतिक स्तरावरील स्पर्धात्मकता टिकवून धरण्यासाठी चिनी कंपन्यांनीही कंबर कसली आहे. उत्पादन खर्चात कपात घडवून आणून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता तगवण्यासाठी कंपन्या आपले (मनुष्यबळासंदर्भात) आकारमान सडपातळ राखण्याच्या मागे आहेत. कायमस्वरुपी नोकरी/ रोजगाराच्या जागी हंगामी, कंत्राटी तत्वावर नेमलेले कामगार उत्पादन प्रक्रियेमध्ये सामावून घेतले जात आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवरील श्रमविभागणीमध्येही परिवर्तन होते आहे. जगभरात ठिकठकाणी विखुरलेल्या तरुणाईस उपलब्ध असलेल्या रोजगारसंधींवर या साऱ्या बदलांचे वेगवेगळे परिणाम होताना दिसतात.

देशोदेशीच्या बाजारपेठा परस्परांत गुंफल्या गेल्याने भांडवलाच्या जागतिक स्थलांतरणालाही वेग आला आहे. भांडवली गुंतवणूक रोजगारनिर्मितीस इंधन पुरविते. त्यातून मनुष्यबळाच्या स्थलांतरणालाही जोरदार चालना मिळते आहे. जागतिक पातळीवरील या स्थलांतरणासंदर्भात स्थलांतरितांचे वयानुसार वर्गीकरण आणि त्या संदर्भातील देशनिहाय अद्यावत सांख्यिकी सहजासहजी उपलब्ध होत नाही. जागतिक श्रम संघटनेने संकलित केलेल्या २००२ सालच्या एका आकडेवारीनुसार जागतिक स्तरावरील स्थलांतरितांमध्ये युवकांचे प्रमाण सरासरी १५ टक्क्यांच्या आसपास असल्याचे दाखले मिळतात. एकंदरच, श्रीमंत देशांमध्ये उपजीविकेच्या संधी शोधण्याबाबतचे आकर्षण युवकांमध्ये प्रकर्षाने वाढत असल्याचे अनुभवास येते. परंतु, आंतरराष्ट्रीय स्थलांतरणासंदर्भातील किचकट कायदेकानूंची तपशीलवार माहिती या इच्छुकांना असतेच असे नाही. अपुऱ्या माहितीच्या शिदोरीलाच जोड असते ती या तरुणांच्या खांद्यांवर असलेल्या अवास्तवा अपेक्षांच्या गाठोड्याची. पुरेशी माहितीच गाठीशी नसल्याने रोजगारासाठी आपल्या देशाच्या सीमा ओलांडणाऱ्या युवकांची बरेचदा दिशाभूल होते. परिणामी, अनधिकृत, बेकायदेशीररीत्या स्थलांतर करणाऱ्यांचे तांडे दिवसागणिक फुगताना दिसतात. या अशा अनधिकृत स्थलांतरितेच्छुकांना परदेशांतील नोकऱ्यांचे आमिष दाखविणारी, तथाकथित साहाय्य करणारी मध्यस्थ, दलालांची एक व्यापक अशी

समांतर यंत्रणा जगभरातच फोफावलेली आहे. या समांतर यंत्रणेच्या कचाट्यात फसणाऱ्या युवकांमध्ये तरु ण मुली तसेच महिलांचे प्रमाण गेल्या दोन दशकांत लक्षणीयपणे वाढलेले दिसते. परदेशांतील नोकरीच्या आशेला भुलून प्रसंगवशात वाममार्गाला लावल्या गेलेल्या मुली व स्त्रियांच्या संख्येतही प्रत्यही वाढच अनुभवास येते. अशा तऱ्हेची फसगत झालेल्यांमध्ये तुलनेने गरीब, अल्पशिक्षित आणि मुख्यत: ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या तरुणींचे प्रमाण अधिक असते, असाच सार्वत्रिक अनुभव आहे.

या सगळ्यात माध्यमांची भूमिकाही कमालीची महत्वाची ठरते आहे. आधुनिक माध्यमांवर युरोपीय तसेच उत्तर अमेरिकी कंपन्यांची जबर पकड आहे. परिणामी, पाश्चिमात्य युरोपीय मूल्ये तसेच संस्कृतीची चौकटच दर्शकांसमोर आक्रमकपणे येताना दिसते. जागतिकीकरणामुळे काही समाजघटकांच्या आर्थिक-भौतिक जीवनाचा स्तर चांगलाच उंचावलेला असल्याने अन्य घटकांच्या अपेक्षांची कमानही चढतीच असलेली दिसते. भौतिक सुबत्ता-समृद्धीबाबतच्या तरु णांच्या कल्पनाही एकदम वाढलेल्या आहेत. त्यातच, माध्यमांच्याद्वारे पाश्चिमात्य जीवनशैलीचेच दर्शन सातत्याने घडत असल्याने नोकरी, रोजगार, मेहेनताना, कामाचे ठिकाण, अपेक्षा यांबाबतच्या आजच्या तरु णाईच्या आशा-आकांक्षाही मुळापासूनच बदलताना दिसतात. या सगळयामधून तरु णांमध्ये फैलावणाऱ्या प्रवृत्ती या स्थानिक परिसरातील सामाजिक तसेच सांस्कृतिक घडी बदलून टाकणाऱ्या (की बिघडविणाऱ्या ?) आहेत, हे वास्तव आज ठिकठिकाणी सामोरे येते आहे.

तरु णांच्या भवितव्याचा विचार करताना शिक्षण संधींच्या उपलब्धतेचा मुद्दा कळीचा ठरतो. इथे शिक्षणाच्या सुविधांचा विस्तार-प्रसार आणि दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता हे तीनही पैलू महत्त्वाचे ठरतात. उभ्या जगातच आजमितीस सर्वसाधारणपणे शिक्षणाचे प्रमाण आणि पातळी उंचावलेली आहे. शाळेत भरती होणाऱ्यांची संख्या व प्रमाणही चांगले वाढलेले दिसते. काही देशांमधील पटनोंदणी १९९० च्या दशकात जवळपास दुपटीने वाढल्याचीही उदाहरणे आहेत. केवळ इतकेच नाही, तर प्राथमिक शिक्षणाचा टप्पा पूर्ण करणाऱ्यांचे प्रमाण घसघशीत आहे. माध्यमिक शिक्षणातील पटनोंदणीचे सरासरी प्रमाणही गेल्या दशकात सरासरी ५६ टक्क्यांवरून ७८ टक्क्यांपर्यंत वाढलेले दिसते. त्याहीपुढे शिक्षण सातत्यशील राखणाऱ्यांची संख्या (विशेषत:विकसनशील देशांमध्ये) लक्षणीयरीत्या वाढलेली असल्याचे चित्र गेल्या

दशकात प्रकर्षाने सामोरे आले. परिणामी, आजवरच्या मानवी इतिहासाचा विचार केला तर, आजची युवा पिढी ही सर्वाधिक शिक्षित आहे, असे अनुमान काढता येते.

परंतु, पुन्हा हे चित्रही सर्वत्र सारखे नाहीच. देशोदेशांमध्ये या बाबतही भरपूर तफावत आढळते. शिक्षणाचे एवढ्या मोठ्या प्रमाणावर सार्वत्रिकीकरण एकीकडे झालेले असतानाच दुसरीकडे प्राथमिक शाळेच्या वयोगटातील जगभरची सुमारे १२ कोटी मुले अगदी २००० सालातही शाळेच्या उंबरठ्याबाहेरच असल्याचे चित्रही दिसत होते. वय वाढल्यानंतर, पुढे चालून हीच मुले श्रमांच्या बाजारपेठेतील अशिक्षित श्रमिकांच्या फौजेत दाखल होणार हे उघडच आहे. आजच्या कमालीच्या स्पर्धात्मक आणि श्रमिकांकडून दर्जेदार कौशल्यांची, उपयोजनप्रधान अद्यावत प्रशिक्षणाची वाढती अपेक्षा धरणाऱ्या श्रमांच्या बाजारपेठेत अशा अशिक्षित, अल्पशिक्षित उमेदवारांच्या वाट्यास येणाऱ्या रोजगार संधींचे स्वरूप काय व कसे असेल, याची केवळ कल्पनाच केलेली बरी.

मुलामुलींना किमान शिक्षणापासून वंचित राखण्यामागे पालकांची गरिबी, आर्थिक अक्षमता हेच एक मुख्य कारण असल्याचा, जगभरात या संदर्भात आजवर झालेल्या अभ्यासांचा निर्वाळा आहे. यातही परत लिंगविशिष्ट तफावत, भेदभाव आहेच. तरुण मुले आणि तरुण मुली यांच्यातील शैक्षणिक दरी रुंदावत असल्याचे चित्र आफ्रिका तसेच आशिया खंडात विशेषत्वाने दिसते. आफ्रिकेचा उत्तर भाग तसेच पश्चिम आशिया खंडातील मुलींच्या वाट्याला शिक्षणाच्याबाबतीत येत असलेल्या उपेक्षेचे प्रमाण हे तुलनेने अधिक आहे. तफावतही तीव्रच दिसते. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलींचे मुलांशी असणारे प्रमाण हे ३:१ असे आहे.

शिक्षणविषयक सुविधांची उपलब्धता आणि भौतिक सुविधांचा संख्यात्मक विस्तार यांच्या जोडीनेच या सुविधांद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता हा तर, जागतिकीकरणाच्या आजच्या काळात विशेषच संवेदनशील मुद्दा ठरतो आहे. कारण या पैलूचा साक्षात संबंध हा या शिक्षणव्यवस्थेमधून शिकून बाहेर पडणाऱ्या तरुणाईला श्रमांच्या बाजारपेठेत अनुरूप अशा रोजगार संधींचे दरवाजे खुले होण्याशी आहे. त्यामुळे, शिक्षणाच्या विस्तारासाठी आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधांच्या जोडीनेच शैक्षणिक साधने, शिक्षक आणि त्यांची अध्यापन कौशल्ये, वर्गांमधून शिकविला जाणारा अभ्यासक्रम या पैलूंवरही अधिक लक्ष केंद्रित करण्याची निकड आता जगभरात सर्वत्रच व्यक्त केली जात आहे.

शाळा-महाविद्यालयांच्या चार भिंतींमधून दिले जाणारे शिक्षण कितपत रोजगाराभिमुख आहे, हा त्यापुढील प्रश्नही आता अधिकच टोकदार बनतो आहे. कारण, जागतिक बाजारपेठेशी या ना त्या स्वरूपात, प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे गुंफल्या गेलेल्या उद्योगांच्या शिक्षण-प्रशिक्षण-व्यावसायिक कौशल्यविषयक अपेक्षाही अतिशय वेगाने बदलत आहेत, उंचावत आहेत. परिणामी, चाकोरीबद्ध पद्धतीने दिले जाणारे शिक्षण आणि मनुष्यबळविषयक बाजारपेठीय मागणी यांतील तफावत जगभरात सर्वत्रच वाढताना दिसते. त्यामुळे, सुशिक्षित तरुणांमधील बेरोजगारीचे प्रमाण विशेषत्त्वाने समोर येते आहे. त्यावर उपाय म्हणून, औपचारिक शिक्षणाच्या जोडीनेच व्यवसाय शिक्षणाचा अभ्यासक्रम जोमाने राबविणे आणि अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या आखणी-अंमलबजावणीमध्ये उद्योगघटकांचे सक्रिय सहकार्य घेणे या उभय दिशांनी ठिकठिकाणी प्रयत्न सुरू आहेत. शिक्षण अर्थपूर्ण व रोजगाराभिमुख बनविणे हे उभ्या जगातील तरुणाईच्या भविष्याचा विचार करता अगत्याचेच ठरते. ✿✿

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

# नॅनोटेक्नॉलॉजी : निव्वळ धोकेच की संधीही ?

मानवी जीवनात विलक्षण क्रांती घडविणाऱ्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सतत काही ना काही नवी आव्हाने उभी ठाकत असतात. मानवी जीवन सुखकर बनविण्यासाठी या आव्हानांवर मात करून शास्त्रज्ञ व संशोधक आपले कार्य पुढे नेत असतात. अलीकडे महत्त्वाच्या ठरलेल्या नॅनोटेक्नॉलॉजी (अतिसूक्ष्मदर्शी तंत्रज्ञान) या क्षेत्रातही असे घडते आहे. सर्वसामान्यांच्या दैनंदिन व्यवहारात उपयुक्त ठरणाऱ्या अनेक उत्पादनांसाठी हे तंत्रज्ञान अतिशय महत्त्वाचे ठरले आहे. त्यामुळे या क्षेत्रातील आव्हानांबाबत सामान्य नागरिकांनीही सजग बनणे उचित ठरेल. हे तंत्रज्ञान वापरून विविध घटकपदार्थांपासून तयार केलेले अतिसूक्ष्म घटकपदार्थ (एक मीटरचा एक अब्जावा भाग म्हणजे एक नॅनोमीटर) आणि मानवी जीवनाची सुरक्षा याकडे वॉशिंग्टन येथील 'वुड्रो विल्सन इंटरनॅशनल सेंटर फॉर स्कॉलर्स' येथील नॅनोटेक्नॉलॉजी विषयातील तज्ज्ञ अँड्र्यू मेनार्ड यांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. अशा सुरक्षाविषयक संशोधनांसाठी निधी उपलब्ध व्हावा, असेही काही अभ्यासकांना वाटते.

या तंत्रज्ञानाचा उपयोग करून तयार करण्यात आलेल्या कार्बन नॅनोट्यूब्जचा वापर आज अनेकानेक वस्तूंच्या निर्मितीत करण्यात येत आहे. कार्बन नॅनोट्यूब्ज ग्राफाईटपासून बनविल्या जातात. ग्राफाईट म्हणजे crystaline carbon हे चमकदार असते. पेन्सिलचे शिसे ग्राफाईटपासून बनलेले असते. या कार्बन नॅनोट्यूब्ज पेन्सिलमधील शिसापेक्षा दहा लाख पटीने लहान/सूक्ष्म असतात. या कार्बन नॅनोट्यूब्ज सध्यातरी सुरक्षित मानल्या जात आहेत. पण त्या अतिसूक्ष्म असल्याने त्यांच्यात काही वेगळे गुणधर्म असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण अशा सूक्ष्म पदार्थांच्या सुरक्षेबाबतचे संशोधन गांभीर्याने केले गेलेले नाही. अशा उत्पादनांची निर्मिती करणारे उद्योग, या संबंधीच्या नियामक यंत्रणा आणि विविध देशांची सरकारे यांच्याकडे याची सविस्तर माहिती उपलब्ध नाही. गंमत म्हणजे हे अज्ञान इतक्या मोठ्या प्रमाणावर आहे की संशोधन केले तर त्यामुळे नुसती प्रश्नांची मालिकाच वाढेल, उत्तर मिळण्याची शक्यता कमीच, असे मत तज्ज्ञच मांडतात. टेक्सास येथील राइस विद्यापीठतील या विषयातील

एका तज्ज्ञांनी अशी टिप्पणी केली आहे की, अशा प्रकारचे संशोधन करण्यासाठी संशोधकांच्या पाच वेगवेगळ्या गटांना निधी उपलब्ध करून दिला तर पाच वेगवेगळी उत्तरे मिळतील आणि त्यामुळे या अतिसूक्ष्म घटकांच्या वापराबातची अनिश्चितता वाढण्याचीच शक्यता अधिक. त्यामुळे असे संशोधन केले तरी संशोधनकार्यातील निधी सत्कारणी लागेलच असे म्हणता येणार नाही. उदाहरणार्थ, कार्बन नॅनोट्यूब्जबाबत अशीच वेगवेगळी उत्तरे पुढे आली आहेत.

हा विषय अशा प्रकारे चर्चिला जात असताना उद्योगजगतात मात्र या तंत्रज्ञानाच्या वापराविषयी उत्साह आहे. नॅनोटेक्नॉलॉजीचा उपयोग करून अनेकानेक कंपन्या आपली उत्पादने बाजारात आणत आहेत. अशा उत्पादनांचे व उत्पादन प्रक्रियांचे पेटंट मिळविण्याचा प्रयत्नही कंपन्या करीत आहेत. आणखी एक लक्षात घेण्यासारखा मुद्दा असा की हे अतिसूक्ष्म घटक काही वेगवेगळ्या आकारात बनविता येतात आणि त्यामुळेही त्यांचे गुणधर्म बदलले जाऊ शकतात. अशा घटकांचा वापर इतर घटकांबरोबर करून मूळ उत्पादनाची गुणवत्ता वाढविली जाऊ शकते. काही सौदर्यप्रसाधनांच्या निर्मितीत अशा अतिसूक्ष्म घटकांचा उपयोग केला जातो. उदाहरणार्थ, उन्हापासून त्वचेचे रक्षण करण्यासाठी असलेल्या क्रीम्समध्ये याचा वापर केला जातो. अशा क्रीम्समध्ये टिटॅनियम डायॉक्साईडचा उपयोग करताना त्याचे अतिसूक्ष्म कण (नॅनोपार्टिकल्स) वापरले जातात तेव्हा ही क्रीम्स पारदर्शी दिसतात आणि तरी सूर्याकडून येणाऱ्या अल्ट्राव्हायोलेट किरणांपासून ती त्वचेचे संरक्षण करू शकतात. काही औषधांमध्ये चांदीचे अतिसूक्ष्म कण वापरले जातात. या अतिसूक्ष्म कणांमध्ये जीवाणूंचा प्रतिकार करण्याची शक्ती असते. या गुणधर्माचा उपयोग तयार खाद्यान्न, लहान मुलांच्या खेळण्यांची स्वच्छता, चादरींची स्वच्छता इत्यादींबाबत विशेषेकरून होतो. त्यामुळे त्याला भरपूर मागणी आहे. खाद्यान्नाची निर्मिती करणाऱ्या काही कंपन्या विशिष्ट गुणधर्म असणाऱ्या इतरही काही घटकपदार्थांचे अतिसूक्ष्मकण वापरण्याच्या प्रयत्नात आहेत.

खरे तर दैनंदिन व्यवहारात निसर्गतः असलेले अतिसूक्ष्म कण आपल्या शरीरात प्रवेश करीत असतात. पण त्यांमुळे आपल्या आरोग्याचे नुकसान होतेच असे नाही. पण डिझेल इंजिनमधून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे व गाड्यांची टायर्स रस्त्यावर घासून तयार होणाऱ्या धूलिकणांमुळे हवा प्रदूषित होते. या प्रदूषित हवेतील हे कण मानवी आरोग्याला घातक ठरतात, असे आढळते. शिवाय, रसायनशास्त्राचा

अभ्यास अनेक वर्षे केल्यानंतरही अतिसूक्ष्मकणांचे नेमके वर्तन कसे असते याचा अंदाज अनेकदा बांधता येतोच असे नाही. उदाहरणार्थ, तांब्याचे कण कठीण बनू शकतात, तर इतर कोणत्या घटकपदार्थांना 'रिॲक्ट' न होणाऱ्या सोन्याचे अतिसूक्ष्मकण एकदम 'रिॲक्टिव्ह' होतात. काही अभ्यासांमधून संशोधकांना असेही आढळले आहे की एखादा घटकपदार्थ हानीकारक नसला तरी त्याचे अतिसूक्ष्म कण मात्र मानवी आरोग्याला धोकादायक ठरू शकतात. प्राण्यांवर केलेल्या संशोधनांतून असे आढळते की काही अतिसूक्ष्मकण मानवाची नैसर्गिक असलेली सुरक्षा यंत्रणा ओलांडून मानवी मेंदूपर्यंत पोहचण्यास सक्षम असतात. ते मेंदूत, रक्तात व पेशींमध्ये आपले बस्तान बसवू शकतात. या कणांमुळे शरीरांतर्गत सूज येऊ शकते, ते इतर अवयवांमध्येही प्रवेश करू शकतात तसेच त्वचेतही त्यांचा शिरकाव होऊ शकतो. जेव्हा हे कण वेगवेगळ्या आकारात शरीरात प्रवेश करतात तेव्हा त्यांचे परिणाम वेगळे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकारचे संशोधन मात्र झालेले नाही.

ब्रिटनच्या रॉयल सोसायटीने नॅनोपार्टिकल्सच्या संशोधनाबाबत सजगता दर्शविली असून असे घटकपदार्थ हे संशोधनाच्या दृष्टीने संपूर्णतः नवे घटकपदार्थ समजण्यात यावेत, असे स्पष्ट केले आहे. तर युरोपीय कमिशनने प्रत्येक घटकपदार्थानुसार प्रत्येक संशोधन हे वेगवेगळे मानावे व त्यानुसार त्यासंबंधीचे पुढील निर्णय घेतले जावेत, असे म्हटले आहे. पण प्रत्येक घटकपदार्थाचा असा पर्यावरणीय, आरोग्यविषयक आणि सुरक्षाविषयक अभ्यास-संशोधन करणे अतिशय अवघड आहे. काही देशांमधील सरकारांनी बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचा विचार करता अशी भूमिका घेतली आहे की, उत्पादनांच्या सुरक्षाविषयक बाबीसंदर्भात अतिसूक्ष्मकणांमुळे काही बदल होत नाहीत आणि अशी जबाबदारी उत्पादक कंपनीचीच आहे/असावी. सरकारकडून असे काही मार्गदर्शन नसल्याने काही कंपन्या आपणच आपले धोरण ठरवीत आहेत. विमा कंपन्यादेखील याबाबत पुरेशी जोखीम पत्करण्यास सज्ज नसल्याचे चित्र आहे.

नॅनोटेक्नॉलॉजीशी संबंधित संशोधकांकडून असे प्रश्न सतत उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, ब्रिटनमधील 'नॅनोटेक्नॉलॉजी इंडस्ट्रीज असोसिएशन'ने असे म्हटले आहे की, या विषयातील धोके जाणून घेण्यासाठी करण्यात येणाऱ्या संशोधनांमध्ये सहकार्य, संवाद व एक सुसूत्रता हवी. संशोधकांना कोणत्या प्रकारच्या संशोधनांत रस वाटतो यापेक्षा ग्राहकांना सेवा देण्यासाठी उत्पादनांत काय सुधारणा करता येतील ही संशोधनाची दिशा हवी. दरम्यान, ब्रिटनमधील सरकारची सल्लागार संस्था असलेल्या

'कौन्सिल फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी'ने म्हटले आहे की, नॅनोटेक्नॉजीतील धोक्यांविषयीचे संशोधन फारच धीम्या गतीने चालू आहे. या बाबत वेगाने पावले उचलण्याची गरज आहे. या संशोधनाबाबत अमेरिकेतही असेच काहीसे घडते आहे. या संबंधीचे अपुरे नियोजन व विविध संस्थांमधील समन्वयात कमतरता तेथेही आहे. अमेरिकी काँग्रेसच्या विज्ञान समितीच्या अध्यक्षांनी या ढिसाळपणाबद्दल सरकारच्या अखत्यारीतील 'नॅशनल नॅनोटेक्नॉलॉजी इनिशिएटिव्ह'वर (एनएनआय) टीका केली आहे व आता तरी त्वरित कृती केली जावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. खरे तर या संशोधनाबाबत अमेरिकेने लाखो डॉलरचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. पण त्यातून नेमके काय साधले गेले, याचे समाधानकारक उत्तर संबंधितांजवळ नाही. तरीदेखील नॅनोटेक्नॉलॉजी हा विषय इतका गुंतागुंतीचा आहे की या विषयाशी संबंधित काही मूलभूत प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्यासाठी आणखी लाखो डॉलर उपलब्ध व्हावेत, अशी संशोधकांची मागणी आहे. हवा व पाणी यांच्या संपर्कात आल्यावर या अतिसूक्ष्मकणांचे वर्तन कसे असते तसेच या कणांच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींनी कोणती काळजी घ्यायला हवी अशा अनेक मुद्यांबाबत संशोधन करण्याची गरज असल्याचे मत संशोधक मांडतात. तथापि, असे संशोधन करण्यासाठी अनेक वर्षे लागतील आणि त्यासाठीही जगभरातील संबंधित संशोधकांनी एकत्रित येऊन काही मुद्यांबाबत - संशोधनाबाबतच्या काही संज्ञा आणि काही निकष याबाबत - स्पष्टता होण्याची गरज असल्याचे मत संशोधकांनीच मांडले आहे.

दरम्यान, नॅनोटेक्नॉलॉजी हा विषय जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. २०१४पर्यंत अनेकानेक कंपन्या हे तंत्रज्ञान वापरून अनेकविध प्रकारची उत्पादने बनवतील आणि याची बाजारपेठ फार मोठ्या प्रमाणावर विस्तारेल, असा अंदाज आहे. या संशोधनाबाबतच्या धोक्यांचा विचार जसा होतो आहे त्याप्रमाणेच अशा अतिसूक्ष्मकणांचा उपयोग काही चांगल्या बाबींसाठीही करता येणे शक्य आहे. उदाहरणार्थ -मेंदूविषयक काही विशिष्ट आजार बरे करण्यासाठी, सौरऊर्जा मिळविण्यासाठी वा पिण्याचे पाणी स्वच्छ करण्यासाठी त्याचा उपयोग करण्यात येऊ शकतो. गेल्या काही वर्षांत हे संशोधन इतक्या वेगाने पुढे जाईल अशी अपेक्षा संशोधकांनी वा संबंधित संस्था अणि विविध देशांतील सरकारांनी केली नव्हती. त्यामुळे आता त्याच्या सुरक्षेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असले तरी ते सोडविण्यासाठी वेगाने कृती केली जावी, अशी अपेक्षा आहे.

*(पृष्ठ ४ वरून)*
परंतु संयुक्त राष्ट्रसंघाने युवकांसंदर्भात २००५ साली तयार केलेल्या अहवालाचे अंतरंगही याच वास्तवाची साक्ष देते. जगभरातील युवक, समाजाच्या विविध प्रांतांतील त्यांचा सहभाग, या युवाचमूचे स्वतःचे असे आगळेवेगळेच असणारे 'यूथ कल्चर', युवावर्गाला भेडसावणाऱ्या आर्थिक समस्या, युवकांमधील दारिद्र्य आणि बेरोजगारी, युवकांचे शिक्षण व आरोग्य, सशस्त्र संघर्ष तसेच हिंसाचाराचे तरुणांवर होणारे परिणाम, अशा हिंसक घटनांमध्ये असणारा तरुणांचा सहभाग, या विविध घटनांना असणारे स्त्रीत्वाचे एक वेगळेच परिमाण, तारुण्याच्या उंबरठ्यावर उभ्या असणाऱ्या कोवळ्या मुलींवर या सगळ्याचा होणारा परिणाम.... अशा नानाविध अंगांनी युवकांच्या विशाल विश्वाचे अंतरंग न्याहाळण्याचा प्रयत्न या अहवालात करण्यात आला आहे. युवकांशी संलग्न अभ्यासविषयांचे एक मोठे दालनच या अहवालाद्वारे खुले होत असले तरी त्यात डोकविल्यावर सखोल तपशीलाबाबतच्या अपुरेपणाची, तोकडेपणाची भावना हुरहूर लावते. 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात सादर केलेले त्याच अहवालाचे अंतरंग न्याहाळताना वाचकांनाही तिची प्रचिती यावी. खास युवकांवरच 'फोकस' असलेल्या अभ्यास-संशोधन-सर्वेक्षणांची वैश्विक गरजच यातून मनावर ठसते. बाजारपेठीय प्रवाहांच्या झपाट्यात लपेटून जात असलेल्या आजच्या जगात 'युवक' हा एक उभरता ग्राहक वर्ग म्हणून जगभरातच आकर्षण केंद्र बनतो आहे. 'ग्राहक' म्हणून या वर्गाच्या असणाऱ्या गरजा समजावून घेण्यासाठी, त्यांच्या आवडीनिवडी-पसंतीचा अचुक वेध घेण्यासाठी तयार कपडे, फॅशन, सौंदर्यप्रसाधने, दुचाकी तसेच चारचाकी वाहने, पर्यटन, करमणूक असे नानाविध उद्योगघटक प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसतात. त्या संबंधीचे अभ्यास-पाहण्या-सर्वेक्षणे अप्रतिहत चालू असल्याचे आपण प्रत्यही पाहतो. परंतु, एक जबाबदार समाजघटक म्हणून युवकांच्या या जोषपूर्ण वर्गाकडे समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून आणि संशोधकीय अंगाने तितक्याच सखोलपणे बघितले जात असल्याची आश्वासक उदाहरणे आजूबाजूला फारशी आढळत नाहीत. याला काय म्हणावे ?.....उपेक्षा, बेफिकिरी, आळस, संवेदनहीनता की आकलनाचा अभाव ?

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

**आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ**

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

● मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**(१ जून २००६ पासून)**

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## ‘भारतातील गरिबी सरकारच्या अकार्यक्षमतेपायीच!’

**- लॉर्ड मेघनाद देसाई**

उदारीकरण आणि आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस भारताने १९९१ साली खऱ्या अर्थाने प्रारंभ केला. आता त्या प्रक्रियेस जवळपास १६ वर्षे पूर्ण होत आहेत. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचे लाभ केवळ ‘इंडिया’लाच मिळाले आणि ‘भारत’ मात्र त्यापासून उपेक्षित राहिला, असा एक सूर आळवला जातो. उदारीकरण आणि खासगीकरणाचे धोरण अवलंबल्याने भारतातील दारिद्र्याचा प्रश्न सघन बनला

---

*ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड मेघनाद देसाई यांनी ‘फ्यूचर डायरेक्शन्स फॉर इंडिया इन्कॉर्पोरेट’ या विषयावर पुणे येथे गुरुवार, २० डिसेंबर २००७ रोजी केलेल्या भाषणाचा हा गोषवारा. लंडनस्थित देसाई यांना ‘हाऊस ऑफ लॉर्ड्स्’ या प्रतिष्ठेच्या ब्रिटिश सभागृहाचे सन्मान्य आजीव सदस्यत्व १९९१ साली बहाल करण्यात आले. मुंबई विद्यापीठाचे पदवीधर असलेल्या देसाई यांनी पेनसिल्व्हेनिया विद्यापीठातून डॉक्टरेट संपादन केली. अर्थशास्त्राच्या अध्ययन-अध्यापनात वैश्विक स्तरावर अग्रगण्य गणल्या गेलेल्या ‘लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स’ या संस्थेशी व्याख्याता, वरिष्ठ व्याख्याता, प्रपाठक, प्राध्यापक आणि लंडन स्कूलच्या ‘सेन्टर फॉर द स्टडी ऑफ ग्लोबल गव्हर्नन्स’ चे संचालक अशा बहुविध नात्यांनी त्यांचा संबंध राहिलेला आहे. अर्थशास्त्रात लॉर्ड देसाई यांना लाभलेली अंतर्दृष्टी तसेच त्यांच्या अनुभवाचा लाभ जागतिक बँक, अंक्टाड, युनिडो, यूएनडीपी, संयुक्त राष्ट्रांची अन्न व शेती संघटना अशा नानाविध संस्थांनी आजवर वेळोवेळी घेतला आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी स्थापन केलेल्या ‘महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेन्ट कौन्सिल’ या संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प लॉर्ड मेघनाद देसाई यांनी गुंफले.*

आहे, असेही मतप्रदर्शन केले जाते. परंतु गरिबीच्या देशांतर्गत प्रमाणासंदर्भातील सांख्यिकीद्वारे सामोरे येणारे चित्र मात्र या प्रतिपादनाशी मिळतेजुळते नाही. उलटपक्षी आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या तामिलीस सुरुवात झाल्यापासून दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठणाऱ्यांचे प्रमाण घटल्याचाच दाखला संबंधित आकडेवारी देते. एकेकाळी साधारणपणे ३५-३६ टक्क्यांच्या घरात असणारे हे प्रमाण आजमितीस २५-२६ टक्क्यांपर्यंत खाली आलेले दिसते. त्यामुळे, आर्थिक पुनर्रचना, खासगी उद्योग क्षेत्रास प्राधान्य आणि खुल्या बाजारपेठीय नियमांनुसार होणारे अर्थव्यवहार यांपायी भारतातील दारिद्र्याचा प्रश्न गंभीर बनला आहे, या प्रतिपादनात वास्तवाशी प्रतारणा होते. अशी भूमिका घेणे हे अयथार्थ आहे. इथे खरी समस्या आहे ती उत्पन्नाच्या विषम वाटपाची आणि वाढत्या विषमतेची. आर्थिक वाढीचा दर उच्च व सातत्यशील राहणे आणि त्याच वेळी या प्रगतीचा ओघ तळापर्यंत झिरपावा यासाठी योग्य अशा वितरणात्मक धोरणांचा प्रभावशील अवलंब सरकारने करणे हे या विषमतेचा सामना करण्यासाठी अत्यावश्यक आहे. म्हणजेच, खरा प्रश्न आहे तो सरकारी यंत्रणेच्या कार्यक्षमतेचा.

सरकार अथवा शासनसंस्था आणि देशातील सर्वसामान्यांना पायाभूत सुविधा पुरवण्यासंदर्भातील या शासनसंस्थेची पुरेपूर अकार्यक्षम ठरलेली यंत्रणा व कार्यप्रणाली, हेच भारतातील गरिबीचे खरे कारण आहे. गरिबीचे उच्चाटन करण्यात सरकार या संस्थेला यश आलेले नाही. दारिद्र्याचे निर्मूलन करण्यात सरकारला खरोखरच रस असता आणि त्याच्या ठायी ती क्षमता असती तर स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षांत गरिबी केव्हाच हटली असती. 'सरकार'नामक संस्थेची पूर्णतः अपयशी ठरलेली अशी 'डिलिव्हरी मशिनरी' आणि 'डिलिव्हरी मेकॅनिझम' हेच भारतात आज प्रचलित असलेल्या गरिबीचे मुख्य कारण आहे. सार्वजनिक शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य या उभय सेवांची सध्याची दुरवस्था या वास्तवाची साक्ष देते. सर्वसामान्य नागरिकांच्या अंगभूत क्षमतांचे वर्धन-संगोपन करण्यात या उभय सेवांचा सिंहाचा वाटा असतो. खुल्या बाजारपेठीय नियमांनुसार नियंत्रित होणाऱ्या अर्थव्यवहारांत सहभागी होऊन दमदार आर्थिक विकासाची फळे पदरात पाडून घेण्याची क्षमता समाजाच्या विविध स्तरांमध्ये निर्माण करण्यात या पायाभूत सेवासुविधांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरतो. या सेवांचा पुरवठा करण्याची प्रधान जबाबदारी ज्या सरकारवर त्याच सरकारची या संदर्भातील कामगिरी पूर्णतः कुचकामी ठरल्यामुळेच उदारीकरणामुळे गतिमान झालेल्या विकासाच्या प्रवाहापासून काही समाजघटक हे वंचित राहिलेले दिसतात. त्यामुळे विविध प्रकारच्या

उत्पादक क्षेत्रांमधून सरकारने शक्य तितक्या लवकर बाहेर पडणेच इष्ट, असे माझे स्पष्ट मत आहे. सरकारी कंपन्यांमध्ये गुंतलेले भांडवल मोकळे करून सरकारने तो पैसा पायाभूत सेवासुविधांचा वाढीव पुरवठा आणि अस्तित्वात असलेल्या सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी खर्च करावा अथवा जुनी कर्जे फेडून टाकण्यासाठी तो वापरावा. यामुळे 'इंडिया' आणि 'भारत' या दोघांच्याही हिताचे संवर्धनच होईल.

महाराष्ट्राच्या काही भागांत ज्वलंत बनलेला शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न, एका अर्थाने, याच संदर्भात चिंतनीय ठरतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे खापर सर्वस्वी जागतिकीकरणावर फोडणे उचित नाही. आत्मघातासाठी एखाद्या शेतकऱ्यास प्रवृत्त करण्यास अन्य अनेक घटक कारणभूत ठरत असले तरीही, सर्व स्तरांतील शेतकऱ्यांना राष्ट्रीयीकृत संघटित बँकिंग व्यवसायाच्या परिघात आपण आजवर का आणू शकलो नाही, हा इथे कळीचा मुद्दा ठरतोच. पतपुरवठ्याच्या अधिकृत, संघटित स्त्रोतांच्या दरवाजापर्यंत पोहोचू न शकणाऱ्या समाजघटकांना मग खासगी सावकारांचे दार खटखटवण्याखेरीज अन्य पर्यायच उरत नाही. प्रत्येक कर्जदाराच्या विविक्षित अशा पतविषयक गरजेचे आणि त्याला केलेल्या पतपुरवठ्याशी निगडित जोखमीचे मोजमाप खासगी सावकार ज्या निष्णातपणे करतो, कर्जदाराच्या पतधारण क्षमतेसंदर्भात, त्याच्या आर्थिक परिस्थितीसंदर्भात आवश्यक ती सारी माहिती सावकार ज्या चिकित्सकपणे जमा करतो तशी काटेकोर कार्यप्रणाली संघटित बँकांच्या ठायी का निर्माण होऊ नये ? बँकांची कमालीची ठेकळेबाज कार्यपद्धती, केवळ कागदी घोडे नाचविण्यावरच अतिरिक्त भर देणारी किचकट अशी कार्यप्रक्रिया बदलण्याखेरीज या पुढील काळात पर्यायच राहणार नाही. आज ही परिस्थिती आहे, उद्या खासगी बँका आणि त्यांच्या जोडीनेच परदेशी बँका जोमाने कार्यरत झाल्यानंतर राष्ट्रीयीकृत बँकांचे भवितव्य काय राहील ?

तसे पाहिले तर एका बाबतीत भारतीय अर्थव्यवस्था आजमितीस अतिशय भाग्यवान ठरते. डॉ. मनमोहनसिंह यांच्यासारखा एक नाणावलेला अर्थतज्ज्ञ पंतप्रधान, पी. चिदंबरम यांच्यासारखा अर्थनिष्णात अर्थमंत्री आणि डॉ. मॉन्तेकसिंह अहलुवालिया यांच्यासारखा अर्थपंडित केंद्रीय नियोजन मंडळाचा उपाध्यक्ष असा समसमा संयोग जुळून आलेला असतानाही उदारीकरणाचे लाभ समाजात सर्वदूर समानतेने न पसरण्यात सरकारच्या 'डिलिव्हरी मेकॅनिझम'कडे दोषाचा मोठा वाटा जातो, हे वास्तव न लपणारे आहे. एका परीने, युत्या - आघाड्यांच्या राजकारणाचाही तो परिणाम आहेच. बहुपक्षीय सरकारांची अर्थव्यवस्थेस केवढी मोठी किंमत चुकवावी लागते आहे, या बाबीचाही

आपल्याला केव्हा ना केव्हा गंभीरपणे विचार हा करावाच लागणार आहे. उदारीकरण आणि आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यावर आता अत्यावश्यक बनलेल्या सुधारणा त्वरेने मार्गी लावण्यास आघाडी सरकारांमुळे मर्यादा पडतात, हे चित्र आता पुरेसे स्पष्ट झालेले आहे.

कामगार कायद्यांतील प्रदीर्घ काळ प्रलंबित असलेल्या सुधारणा हे याचे सर्वोत्तम उदाहरण. सेवाप्रधान अर्थव्यवस्था असा आजमितीस भारताचा लौकिक आहे. देशांतर्गत ठोकळ उत्पादनामध्ये या क्षेत्राचा वाटा जवळपास ६० टक्क्यांच्या आसपास आहे. एखादी अर्थव्यवस्था या प्रमाणे एवढी सेवाप्रधान असणे हे तिच्या दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य तसेच बुलंदीच्या दृष्टीने कितपत हितावह आहे, ज्या अर्थव्यवस्थेचा वस्तुनिर्मिती पाया इतका संकोचत आहे त्या अर्थव्यवस्थेतील सेवांचा विस्तार तरी वर्धिष्णू राहील का, सर्वसाधारण आर्थिक विकासाचा उन्नयन क्रम हा 'शेती -उद्योग- सेवा' असाच असतो हे आजवर बहुतेक ठिकाणी दृष्टोत्पत्तीस आले आहे. सैद्धांतिक पातळीवरही ते तर्कशुद्धच ठरते. असे असताना, ज्या अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राचा विस्तार हा त्याच अर्थव्यवस्थेतील वस्तुनिर्मिती क्षेत्रांच्या वाढविकासाचा नैसर्गिक पुढील टप्पा म्हणून साकारलेला नाही, अशा अर्थव्यवस्थेची सेवाक्षेत्रप्रणित आगेकूच ही कितपत सातत्यशील राहील, हे व यांसारखे अनेक प्रश्न या संदर्भात उपस्थित होतात. हे सारे सवाल संयुक्तिकच आहेत. माझ्या लेखी, (सैद्धांतिकदृष्ट्या तरी) एखादी अर्थव्यवस्था सेवाप्रधान असणे, तिची सारी प्रगती सेवाक्षेत्रप्रणित असणे यात काहीही गैर नाही.

परंतु, त्याच वेळी या वास्तवाचे रोजगारसंलग्न पैलूही नजरेआड करता येणार नाहीत. आर्थिक उदारीकरणानंतर - म्हणजे १९९१ सालानंतर - वित्तीय सेवा, बँकिंग, विमा, पर्यटन, व्यापार, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा, सल्लासेवा यांसारख्या सेवांचा जो अप्रतिहत विस्तार घडून आलेला आहे त्याद्वारा विस्तारलेल्या रोजगार संधी या प्रामुख्याने उच्च शिक्षित तसेच या नवक्षेत्रांमध्ये शिरकाव करून घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविक्षित प्रशिक्षण व कौशल्य शिक्षण हस्तगत केलेल्या उमेदवारांसाठीच अनुरूप ठरलेल्या आहेत. परिणामी, ठोकळ देशी उत्पादनात सेवा क्षेत्राच्या असणाऱ्या हिश्श्यात घसघशीत वाढ घडून आलेली दिसत असली तरी देशांतर्गत रोजगाराचा आकृतिबंध मात्र अजूनही फारसा बदललेला नाही. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या सहा दशकांत बिगर शेती उद्योग-व्यवसायांतील रोजगार

विस्तारलेला दिसत असला तरी आजही एकूणांतील सुमारे ५३-५४ टक्के मुख्य श्रमिक हे या ना त्या रूपाने शेती वा शेतीसंलग्न व्यवहारांवर उपजीविकेसाठी अवलंबून आहेतच. यातही पुन्हा राज्यवार तफावत भरपूर दिसते. भारतीय अर्थव्यवस्था सरासरी सहा-सात-साडेसात टक्के दराने अलीकडील काळात वाढताना दिसत असली तरीं गरिबी आणि तिचे एक मुख्य कारण असणारी बेरोजगारी यांचेही अस्तित्व अर्थव्यवस्थेत आढळून येते या विरोधाभासाचे मूळ नेमके इथेच दडलेले दिसते.

उपजीविकेसाठी शेतीसह एकंदरच प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांच्या प्रमाणात घट घडवून आणण्यात भारताला अजूनही यश आलेले नाही. श्रमशक्तीचा शेतीवरील अतिरिक्त भार घटविणे हे भारतासाठी अत्यावश्यकच आहे. त्यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेच्या बिगर शेती क्षेत्रांतील रोजगार संधींचे दरवाजे विस्तारणे, प्रशस्त बनणे हे निकडीचे आहे. देशाच्या वस्तुनिर्मिती उद्योगांचा जोमाने विकास व विस्तार होणे हे या संदर्भात अगत्याचे ठरते. उद्योगांचा जोमदार विकास घडून येणे, हा शेतीवरील अतिरिक्त मनुष्यबळाचा भार कमी करण्याचा मुख्य मार्ग ठरतो. विस्तार योजना राबविताना उद्योगघटकांनी श्रमप्रधान, श्रमसघन उत्पादनतंत्राचा अवलंब केल्याने शेतीमधील अतिरिक्त मनुष्यबळ आणि पर्यायाने छुपे बेरोजगार उद्योगांमध्ये सामावून घेतले जातील. नेमक्या याच कारणासाठी कामगार कायद्यांमध्ये सुधारणा घडवून आणण्यास अधिक विलंब होता कामा नये.

आजमितीस, संघटित उद्योगांच्या उत्पादन वाढीचा वेग आणि संघटित उद्योगांमधील रोजगारवाढीचा वेग यांत भरपूर तफावत दिसते. मुळात, भारतीय रोजगाराचे चित्र असे आहे की संघटित रोजगाराचे एकंदर रोजगारातील प्रमाण जेमतेम आठ-नऊ टक्क्यांएवढे अल्प आहे. या अल्पस्वल्प असणाऱ्या संघटित रोजगारातील वाढही गोठलेलीच दिसते. कारण, सेवेमध्ये कंपनीत एखादा कामगार नेमलाच तर त्याला प्रचलीत कामगार कायद्यांचे संरक्षक कवच लाभून त्याला कामावरून कमीच करता येणार नाही, अशी भीती उद्योगांना वाटते. या भीतीपायी ते नवीन कामगार भरती टाळतातच. रोजगारनिर्मितीस पूरक असे बदल कामगार कायद्यांत केल्याखेरीज हे चित्र पालटणार नाही. कामगार कायद्यांत अनुरूप सुधारणा करून अधिकाधिक श्रमिकांना उत्पादन प्रक्रियेत, उत्पादक क्षेत्रांत सहभागी करून घेणे हाच दारिद्र्याच्या निर्मूलनाचा प्रभावी पर्याय ठरेल. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमासह एकंदरच उदारीकरणाचे लाभ समाजातील आजवरच्या उपेक्षित वर्गांपर्यंत पोहोचविण्याचा हाच हमखास मार्ग आहे.

आर्थिक सुधारणांचे फायदे आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी विविध समाजघटकांना सक्षम बनविण्याचा रोजगार, औद्योगिक रोजगार हा सर्वांत सुभग पर्याय आहे.

कामगार कायद्यांतील सुधारणांबाबत उद्योजकांच्या संघटना-व्यासपीठांनी या पुढील काळात विशेषत्वाने आग्रही राहण्याची गरज आहे ती यासाठीच. आज सरकार नेमके हेच करताना दिसत नाही. सरकारचा सारा भर हा राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसारख्या योजना आखण्या-राबविण्यावरच आहे. अशा योजनांमुळे बेरोजगारी आणि गरिबीच्या दुहेरी समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा शोधता येत नाही. अशा प्रकारच्या योजना तयार करणे अथवा नानाविध प्रकारची अनुदाने वाटत बसणे हा सरकारच्या लेखी देशातील गरिबांना सक्षम करण्याचा कार्यक्रम आहे. अनुदाने वा अन्य स्वरूपांतील अर्थसाह्याच्या वाटपातून समाजातील खरोखरच जे गरजू घटक आहेत अशांना दीर्घकालीन, ठोस लाभ काहीच होत नाहीत, अशा प्रकारच्या अर्थसाह्यांतून स्वतःच्या पायांवर उभे राहण्याइतपत सबलीकरण साधले जात नाही, याचे भरपूर दाखले आजवर आपल्या पोतडीत जमा झालेले आहेत. मुळात, अशा योजनांसाठी दिल्लीतून वितरित होणाऱ्या दर १०० रुपयांपैकी जवळपास ८५ रुपये हे मध्येच जिरतात आणि तळापर्यंत त्यातील जेमतेम १५ रुपयेच काय ते कसेबसे पोहोचतात, हाच आपला आजवरचा अनुभव आहे. अशा परिस्थितीत, प्रदीर्घ काळ ज्यांची प्रतीक्षा आहे अशा सुधारणा कामगार कायद्यांमध्ये घडवून आणून औद्योगिक रोजगार वाढीस चालना देण्यानेच देशातील गोरगरिबांचे खऱ्या अर्थाने सबलीकरण होऊन आर्थिक पुनर्रचना तसेच विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याच्या क्षमता त्यांच्या ठायी निर्माण होऊ शकतील.

'विशेष आर्थिक क्षेत्रां'सारख्या (स्पेशल इकॉनॉमिक झोन्स -सेझ) योजनांचीदेखील चिकित्सा याच पद्धतीने होणे गरजेचे आहे. 'सेझ'च्या धोरणाचे विद्यमान स्वरूप पाहता, धनदांडग्यांना जमिनी उपलब्ध करून देऊन त्याच्या बदल्यात आपल्या राजकीय स्वार्थाची तरतूद करण्याची प्रेरणा त्यामागे असल्याचे स्पष्ट जाणवते. या साऱ्या बाबी ध्यानात घेता, भारतीय संघटित औद्योगिक क्षेत्राला, 'कॉर्पोरेट' विश्वाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनांना यापुढील काळात अधिक ठोस भूमिका घ्यावी लागेल, अनुचित वाटणाऱ्या धोरणांना (प्रसंगी सरकारच्या इतराजीची तमा न बाळगता) विरोध करण्याचे धैर्य दाखवावेच लागेल. त्यास पर्याय नाही.

✿✿

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

**निवडक श्री. म. माटे : खंड १ व खंड २; निवड - विनय हर्डीकर आणि म. श्री. माटे, प्रकाशक - देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., ४७३, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, डिसेंबर २००७, पृष्ठे - खंड १ - प्रस्तावना - एक ते पस्तीस अधिक २९८; खंड २ - ३४९, किंमत - खंड १ व २ प्रत्येकी ३५०/- रुपये.**

संपादन, संशोधन, संकलन, चरित्रलेखन, तत्वचिंतन, संत-पंत-तंत काव्याची चिकित्सा, लघुकथांसारखे ललित वाङ्‌मय अशा बहुढंगी प्रकारच्या विवेचक साहित्यनिर्मितीद्वारे 'एक समाजाभिमुख, समाजहितैषी समाजाभ्यासक-लेखक', अशी आपली प्रतिमा सिद्ध करणारे श्री. म. माटे हे विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या साहित्य व समाजसेवेच्या प्रांतातील एक अग्रगण्य व्यक्तिमत्व. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर आणि विठ्ठल रामजी शिंदे या त्रिमूर्तीस आपल्या जीवनात आदरस्थान प्रदान करणाऱ्या माटे यांनी या तिघांच्याही विचार तसेच कार्याची प्रेरणा आपल्या जीवनभरच्या उद्योगामागे सातत्याने ठेवली. गेल्या शतकातील महाराष्ट्राच्या साहित्यिक, संशोधकीय तसेच सामाजिक वाटचालीचा अभ्यास करणाऱ्या कोणाही अभ्यासकास माटे यांच्या विचारविश्वात डोकवल्याखेरीज पर्यायच नाही. 'जो क्रियावान असतो तोच पंडित', हे संस्कृत वचन ज्यांच्या संदर्भात सार्थ ठरते अशा श्री. म. माटे यांच्या विपुल लेखनसंभारातून निवडलेले माटे यांचे वेचक लेखन, माटे यांच्या ५०व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या या द्विखंडात्मक ग्रंथप्रकल्पामुळे आजच्या वाचक-अभ्यासक-संशोधकांना उपलब्ध झाले आहे. या ग्रंथाला विनय हर्डीकर यांनी लिहिलेली पस्तीस पानांची प्रगल्भ प्रस्तावना हे या देखण्या ग्रंथद्वयाचे आणखी एक वैशिष्ट्य. मध्ययुगीन महाराष्ट्रातील भागवतधर्मीय संत आणि त्यांच्या साहित्याचे माटे यांनी केलेले विश्लेषण, त्या नंतरच्या काळातील मराठी साहित्याचा त्यांनी घेतलेला वेध, माटे यांनी केलेले व्यक्तिविषयक लेखन, माट्यांचे ललित लेखन, विज्ञानबोधाची त्यांनी लिहिलेली प्रदीर्घ आणि तितकीच विवेचक प्रस्तावना, माटे यांचे गीताविषयक लेखन, अस्पृश्यांच्या प्रश्नांबाबत त्यांनी केलेला ऊहापोह अशा विविधांगी लेखनाने या द्विखंडात्मक ग्रंथाचे अंतरंग सजलेले आहे. ■■

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
Licensed to Post Without Prepayment, LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •अभय टिळक •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी
•सुहास पळशीकर •रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**